# माणूस पुढील अंकी

शनिवार
३ जुलै ७१
पन्नास पैसे

मुंडके नसलेल्या माणसाची आकृति पावलाचा आवाजही न करता चालत जाते आणि उंच उंच होत अदृश्य होते...

■

अंगात कालीमाता संचारणारी बाई हातात जळते निखारे घेते...

■

भानामतीमुळे घरातल्या वस्तु इतरत्र फेकल्या जातात...

■

मंत्राच्या सहाय्याने सापाचे विष उतरते...

■

कधीही अमेरिका न बघितलेला हॉलंडचा क्रॉइस्ट अमेरिकेत हरवलेल्या मुलीचा नेमका ठावठिकाणा केवळ तिच्या फोटोवरून सांगू शकतो...

■ ■

खऱ्याखोट्याच्या बेमालूम मिश्रणातून तयार झालेल्या या कथांवर विश्वास ठेवायचा का ?

■

जादूगार रघुवीर — डॉक्टर, खरं सांगू, हे सारं थोतांड आहे...

■

दत्ता बाळ — काही मर्यादेपर्यंत या गोष्टींचे अस्तित्व मान्य करावेच लागेल...

■

डॉ. देबसिकदार — या सर्व प्रकारांचे मूळ मानसिक आहे...

■

चारचौघात हमखास रंगणाऱ्या आणि गूढतेच्या वलयात गुरफटलेल्या या विषयावर अनेक तज्ञ-मान्यवरांच्या मुलाखतीतून, देश-विदेशातील संशोधनातून तयार केलेली एक स्वतंत्र पुरवणी — पुढील अंकी

---

## ज्ञात-अज्ञाताच्या सीमारेषेवर

---

संयोजक : डॉ. नरेंद्र दाभोळकर

पृष्ठसंख्या सुमारे ७० : किंमत : ५० पैसे

| माणूस | शनिवार | ३ जुलै १९७१ | पन्नास पैसे |
| --- | --- | --- | --- |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | पाच | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

□ राजा ढाले, सतीश काळसेकर, तुळशी परब, वसंत गुर्जर, एकनाथ पाटील, बाबूराव बागुल, नामदेव ढसाळ या लेखकांनी कवी 'मदहोष' यांच्यासंबंधीचे एक आवाहन प्रसिद्ध केले आहे. कवी मदहोष उर्फ मदन विठ्ठलराव नंदेश्वर क्षयाने आजारी असून आंबेजोगाई येथील रुग्णालयात पुढील महिन्यात त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या शस्त्रक्रिया खर्चासाठी त्यांना फक्त पाचशे रुपयांची गरज आहे, ती मराठी वाचकांकडून भागवली जावी असा वरील आवाहनाचा मतितार्थ आहे.

या अनुरोधाने 'माणूस'ने आंबेजोगाई येथील आपले एक वर्गणीदार वाचक श्री. आंबेकर यांचेकडे पत्र पाठवून चौकशी केली असता त्यांचे पुढीलप्रमाणे उत्तर आले :

स. न. वि. वि.

□ आपले दि. ११-६-७१ चे पत्र काल मिळाले. त्यानुसार टी. बी. व जनरल हॉस्पिटलमध्ये जाऊन चौकशी करून आलो.

श्री. मदन विठ्ठल नन्देश्वर यांना भेटलो. ते सध्या क्षयाने आजारी आहेत. जुलै

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

महिन्यात त्यांचे ऑपरेशन व्हावयाचें आहे.
ते राहणारे 'वडनेरा'चे आहेत. उत्पन्नाचे साधन काही नाही. सध्या त्यांच्याबरोबर त्यांच्या मातोश्री येथे आहेत. त्यांना दवाखान्याच्या आवारातच थोडी निवाऱ्यापुरती जागा मिळालेली आहे.
त्यांनी स्वतःहून मदतीसाठी कुणाकडे याचना केली नसल्याचे सांगितले. त्यांच्या मित्रांपैकी कोणी आपणाकडे कळविले असेल असे ते म्हणाले.
ऑपरेशन दवाखान्यात निःशुल्क होते. काही औषधे पण दिली जातात. पण जी औषधे उपलब्ध नसतात ती ऋग्णाला स्वतःच आणवून घ्यावी लागतात. तसेच टॉनिक, दूध, फळे इत्यादीसाठीं काही खर्च करावा लागतो. त्यासाठी अंदाजे ५०० रुपये खर्च येईल असे ते म्हणाले. व तेवढी मदत कुणाकडून मिळू शकली तर त्यांना ती हवी आहे.
दवाखान्यातील डॉक्टरांपैकी काही माझे मित्र आहेत. त्यांना समक्ष भेटून श्री. नंदेश्वर यांच्याकडे विशेष लक्ष पुरविण्यास सांगत आहे.

मी ३–४ दिवसांनी पुन्हा एकदा श्री. नंदेश्वर यांना जाऊन भेटेन. व त्यांच्या अडचणीपैकी काही येथेच दूर करणे शक्य असल्यास प्रयत्न करीन.

१५ जून १९७१ — रा. दा. आंबेकर, मुख्याध्यापक
शासकीय विविधोद्देशी प्रशाला
आंबेजोगाई.

☐ दि. ५ जून ७१ चा माणूस (भूमिपुत्र) हा आजवरच्या सर्व अंकावर आणि माणूसच्या यशावरील तुरा आहे. मी एक खेडेगावातील शेतकरी आहे. परंतु फक्त शेतकरीच आहे. चेअरमन किंवा सरपंच कुणीच नाही. आजकालच्या मासिकांमधून एवढ्या दांडग्या व्यक्तिमत्वाची ओळख येणेच दुर्मिळ. मला वाटते अशा व्यक्तींच्या जिवनानेच मानवाला जगण्याची प्रेरणा मिळत असते. नाहीतर ह्या सर्व राजकारणी, समाजकारणी आणि धार्मिक घाणेरड्या गदारोळात जगणेच दुरापास्त.

१४ जून, १९७१ — ग. दि. सराटे, वझर, जालना

☐ 'कविता' सदर सुरू केल्याबद्दल धन्यवाद ! भिमाले, नेवसे, पटवर्धन यांच्या कविता व त्यांचा आस्वाद आवडला. भविष्य सदर कधी सुरू करणार ? 'माणूस' चा जरी विश्वास नसला तरी माणसांचा विश्वास असतोच की, 'रणांगण'ची प्रसिद्धी व 'माणूस'मधून लेख देणारे अनिल बर्वे यांचे पुढे काय ? माणूसने नक्षलवादावर परिसंवाद घेतला तर ? प्रामाणिक प्रतिक्रिया नोंदवली.

१५ जून, १९७१ — पद्माकर अनंत शहाडे, पुणे

छोटेबाबू

# दिल्लीवार्ता

## जबरदस्त पराभव

स्वर्णसिंग परतले. जबरदस्त मानहानी घेऊन परतले. पाकिस्तानला आर्थिक मदत बंद करून बंगला देशमध्ये नागरी जीवन प्रस्थापित करा आणि भारतावरचे ओझे उतरवा—म्हणून बड्या राष्ट्रांचे मन वळविण्यासाठी केलेली परराष्ट्र मंत्र्यांची वारी फुकट गेली.

स्वर्णसिंगांना घेऊन येणारे विमान दिल्लीच्या पालम तळावर रात्री उशीराच आले. पत्रकार ताटकळत बसले होते. कारण अमेरिकन शस्त्रें घेऊन दोन जहाजे पाकिस्तानकडे निघाल्याची न्यूयॉर्क टाईम्सने प्रसिद्ध केलेली बातमी आकाशवाणीवर दिवसभर ऐकविण्यात येत होती. त्यावरची प्रतिक्रिया हवी होती.

परराष्ट्र मंत्री आले. म्हणाले, 'बातमी खरी असेल तर अमेरिकेने आमचा विश्वासघात केला आहे. आम्ही तो सहन करणार नाही.'

म्हणजे काय करणार आहोत ?

स्वर्णसिंग रशिया, पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड या देशांशीही बोलणी करून परतत होते. प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपली बाजू मांडली. परिणाम ? शून्य. सर्वांनी सहानुभूतीने त्यांचे म्हणणे ऐकून घेतले...बंगला देशात शांतता आणि स्थैर्य आले पाहिजे हेही या देशांना पटले. पण याह्याखानावर दबाव टाकावा असे कुणासही वाटले नाही.

अमेरिकेने तर स्वर्णसिंगांची पाठ वळताच शस्त्रांची जहाजे कराचीकडे रवाना केली.

शस्त्रांचा सौदा म्हणे पंचवीस मार्च पूर्वी म्हणजे बंगालमध्ये उठाव होण्यापूर्वी झाला होता.

त्यानंतर एप्रिल मेमध्ये सातत्याने शस्त्रांची मदत थांबविण्यात येत असल्याचे अमेरिकन सरकारने जाहीर केले होते. म्हणजे ही शस्त्रे याह्याचे सैन्य बंगाल्याविरुद्धच वापरणार असल्याची खात्री अमेरिकेलाही पटली होती. मग तरीसुद्धा ही जहाजे रवाना झालीच कशी ? करार झाला असल्याने तो रद्द करणे अमेरिकेच्या इभ्रतीला शोभले नसते म्हणून ?

भारताच्या मुत्सद्देगिरीचा हा जबरदस्त पराभव नाही तर काय ?

न्यूयॉर्क टाईम्सने प्रसिद्ध केलेल्या बातमीने दिल्लीत वातावरण तापून गेले खरे.

दोन्ही सभागृहात अमेरिकेच्या या कृतीचा कडाडून निषेध करण्यात आला. अमेरिकन वकिलातीवर मोर्चा गेला.

निदान या बोटी वाटेत अडविण्याची विनंती करण्यात आली.

अमेरिकन वकिलातीचे एक्झिक्युटिव्ह कौन्सलर ग्लैन स्टोन म्हणाले, 'विनंतीचा विचार करा. पण बहुधा बोटी अडविण्याची शक्यता नाहीच. कारण बोटी पाकिस्तानी आहेत.'

विरोधी पक्षात पहिली प्रतिक्रिया उमटली ती अशी : रशियाकडे आमचे सरकार झुकत चालले आहे, म्हणून अमेरिका अशा प्रकारे शह देत आहे !

ते काहीही असलं तरी भारतात येणाऱ्या निर्वासितांची समस्या सोडविण्यासाठी परराष्ट्र मंत्र्यांनी केलेले प्रयत्न फुकट गेले हे खरे. मदत मिळाली नाहीच, पत मात्र गेली.

## हे जोखड नकोच ...

इकडे त्याचवेळी आमच्या गृह आघाडीवर केंद्र सरकार आणखी एक मानहानी सहन करीत आहे. निर्वासितांच्याच प्रश्नावर.

मंत्र्यापाठोपाठ मंत्री पाठवून इंदिरा गांधी परदेशी सरकारांची मने वळवू पहात आहेत, पण त्याच वेळी त्यांना देशातल्या राज्य सरकारांची मनं मात्र वळविता येत नाहीत.

तामिळनाडू म्हणते, आमच्याकडे हे निर्वासित नकोत. आधीच आमच्यात सिलोनचे निर्वासित आले आहेत. ओरिसा म्हणतं आमच्याजवळ ब्रह्मदेशातून आलेले आहेत. नवं दुखणं आमच्यावर लादू नका. महाराष्ट्र, गुजरात, म्हैसूर—कुणीच अनुकूल प्रतिसाद देत नाहीत.

इंदिरा गांधींनी गेल्या दोन आठवड्यात या प्रश्नावर केलेली वक्तव्यं पहाता कुणाचीही याला तयारी नाही, हे स्पष्ट होत गेलं. त्यामुळे पश्चिम बंगाल, मेघालय, आसाम या सीमालगतच्या प्रांतावरचे ओझे दिवसेंदिवस वाढत चालले आहे. कॉलरा पसरून आणखीनच धोका वाढत चालला आहे. पाऊस सतत अडथळा आणतो आहेच.

सीमेपासून दूरवर असलेल्या राज्यांना वाटतं, निर्वासितांना आपण एकदा स्थान दिलं की आपल्या आर्थिक प्रगतीला खीळ बसलीच. मग नवे कर, नवी अप्रियता—

आमचे केंद्र सरकार कितीही म्हणत असले तरी निर्वासित पूर्व बंगालमध्ये परत जाणार नाहीतच अशी खात्री अनेकांना आहे. समजा उद्या मुजिबचे सरकार आले तरीसुद्धा भारतात मिळत असलेले स्थैर्य टाकून बंगाली परततील ही शक्यता नाही.

पृष्ठ ६ वर

सहानुभूती गमावून बसलेली

# मुंबईची टॅक्सी !

परवा मुसळधार पाऊस पडला आणि त्रेधातिरपीट उडालेल्या मुंबईकरांनी घरी जाण्यासाठी मिळेल त्या व उपलब्ध असलेल्या सर्वच वाहनांचा आश्रय घेतला. या संधीची ' चांदी ' करून घेतली ती टॅक्सीवाल्यांनी. अशा प्रसंगी त्यांनी असे न वागणे हेच नवल ठरले असते. त्यातच त्याच दिवसापासून ' बॉम्बे टॅक्सीमेन्स युनियन 'ने नवी भाडेवाढ अंमलात आणायचा आदेश दिला होता. ही वाढ पेट्रोल-वरील नव्या केंद्रिय करामुळे आवश्यक ठरल्याने करावी लागत असल्याचे युनियनने जाहीर केले. वाढ फक्त २० टक्के आहे पण परवा टॅक्सीवाल्यांनी २०० टक्के वाढ घेतली. थोड्या अंतरावर जाण्यासाठीही माणशी ५ रुपये हा त्यांचा दर, मंजूर नसेल तर चलेजावचा साळसूद सल्ला. मुंबईत आज १४,३०० टॅक्सीज असून सुमारे ३५ हजार बॅच होल्डर ड्रायव्हर्स असून त्यांपैकी सुमारे १५ हजार, जॉर्ज फर्नांडिस यांच्या ' बॉम्बे टॅक्सीमेन्स युनियन 'चे सदस्य आहेत. हीच सर्वांत मोठी युनियन. दिल्ली, कलकत्ता, मद्रास येथे पेट्रोलवरील करवाढीनंतर तेथील सरकारांनी टॅक्सी-वाल्यांना तात्पुरती भाडेवाढ दिली तर महाराष्ट्र सरकार तांत्रिक कारणांसाठी महिनाभर थांबायला सांगते. ते मान्य करायला युनियन तयार नसल्याने त्यांनी सरकारने मंजूर केलेलेच दर एकतर्फी अंमलात आणण्याचे ठरविले आहे. कारण सुमारे ८० ते १२० मैल रोज धावणाऱ्या टॅक्सीला पेट्रोलवरील वाढीव दरामुळे ५ ते ६ रुपये जादा द्यावे लागतात. टॅक्सीसाठी (खरेदी व इतर गोष्टी धरून) सुमारे २० हजारांवर खर्च होतो आणि मग रोज टॅक्सीवाला ५० ते ६० रुपये कमावतो, पण त्यातील ३० रुपये त्याला ज्या माणसाची टॅक्सी चालवतो त्याला द्यावे लागतात. म्हणजे उरतात २० ते २५ रुपये. हे मुद्दे बाजूला ठेवून इतर काही महत्वाचे मुद्दे येथे देतो.

या व्यवसायात ठेकेदारीला उत आला आहे. शिवाय, चोरटे व्यापारी, चोरट्या दारूचा धंदा करणारे वगैरे या व्यवसायात आले आहेत. ते बेपर्वा वागतात. या-शिवाय जरा आपण त्या ड्रायव्हर्सकडे नजर टाकली तर लक्षात येईल की ते सारे समाजाच्या खालच्या थरातून आलेले व अनपढ असतात. फारच थोडे सुसंस्कृत व सुशिक्षित असतात, त्यामुळे ते असे वागतात. प्रामाणिक असतात पण या व्यव-सायात ' बॅड एलिमेंट 'ही खूप आहे. याचाच परिणाम त्यांचे काही प्रश्न रास्त

असूनही लोकांची सहानुभूती त्यांनी गमावली आहे. परवा फाऊंटनला एक मारामारीचा प्रसग आला होता, पण पोलिसांनी तो प्रसंगावधानाने टाळला. कालपासून तर ते बेमुदत संपावरच आहेत.

१९६६ साली 'टॅक्सी ट्रेड' चौकशी समिती नेमली गेली होती. त्या वेळी युनियनने समितीला अशी सूचना केली होती की, या 'अनपढ' लोकांसाठी, लोकांशी त्यांनी कसे वागावे, टॅक्सी ही लोकसेवा कशी आहे वगैरे शिक्षण देणारे दोन महिने कोर्स चालवून नंतरच योग्य त्या लोकांना परवाने द्यावेत, पण तो अजून अंमलात आल्याचे दिसत नाही. याच युनियनने काही महिन्यांपूर्वी या 'अपप्रवृत्तीं'ना शह देण्यासाठी दक्षता समित्या स्थापन केल्या होत्या, पण पोलीस व त्या व्यवसायातील वाईट लोक यांनी त्यांना धमक्या दिल्या म्हणे, त्यामुळे हा प्रयोग फसला. येथे फक्त एकच प्रश्न विचारावा वाटतो. एका मोठ्या पक्षाचे बळ पाठीशी असूनही युनियन त्यांच्याशी का मुकाबला करू शकली नाही.

टॅक्सीवाल्यांचे अनेक प्रश्न आहेत. मुख्य म्हणजे दूरवर नेऊन पैसे काढून घणे वा भरपूर भाड्याला फसविणे व त्याबाबत पोलिसांनी दखल न घेणे हा होय. पण जोपर्यंत टॅक्सीवाले लोकांना ठकविण्याचे वा मग्रुरीने वागण्याचे सोडत नाहीत तोपर्यंत त्यांना जनतेची सहानुभूती मिळणार नाही.

— एक मुंबईकर

---

## दिल्ली वार्ता

पृष्ठ ४ वरून

त्यामुळेच एकदा हे जोखड बसले की ते कायमचेच, मग ते आधीच टाळलेले बरे अशी भावना या राज्यांची आहे. त्यांच्या डोळ्यासमोर मध्यप्रदेशचे उदाहरण आहे. महाराष्ट्रातील चंद्रपूर कॅम्पचे उदाहरण आहे.

मध्यप्रदेशात मना कॅम्पमध्ये नव्वद हजार निर्वासित गेली दोन तीन वर्षे आहेत. ते इतरत्र जायला राजीच नाहीत. उलट सगळ्यांची अपेक्षा आहे, कायम वास्तव्याची. याच राज्यात इतर हंगामी कॅम्पात तेरा हजार निर्वासित आहेत. आतापर्यंत राज्यात चौसष्ठ हजार पूर्णपणे सामावून गेले आहेत.

यासर्वांसाठी केंद्राला चौपन्न कोटी रुपय खर्च आला. याआधी येणाऱ्या निर्वासितांचा खर्च पूर्णपणे केंद्र सहन करीत असले तरी इतःपर तसे होईलसे वाटत नाही. कारण हा खर्च अवाढव्य असेल आणि एकट्या केंद्राच्या अवाक्याबाहेरचा असेल.

या घटकेलाच केंद्र सरकार महिन्याला एकतीस कोटी रुपये खर्च करीत आहे.

अर्थमंत्र्यांनी अंदाजपत्रकात सहा महिन्यासाठी साठ कोटी रुपये बाजूला काढले. ही रक्कम वास्तवात फक्त दोन महिन्यात संपणार आहे.

निर्वासितांची संख्या वाढतेच आहे.

◻ ◻ ◻

२९ जून ७१ ला श्रीपाद कृष्णांची जन्मशताब्दी साजरी झाली.

# श्रीपाद कृष्ण नाटकवाले

## शतपावली

रवींद्र पिंगे

किर्लोस्कर म्हणजे जसे कारखानेवाले, तसे कोल्हटकर म्हणजे इथून तिथून सगळे नाटकवाले. नाटकं घालणं आणि नाटकं लिहीणं हा कोल्हटकरघराण्याचा कुळाचारच आहे. शेक्सपियर हा सबसे बडा नाटकवाला. त्याच्या 'ऑथेल्लो' ह्या नाटकाचा मराठी अवतार सर्वप्रथम महादेवशास्त्री कोल्हटकरांनी अठराशे एकोणसत्तर साली केला. हा भल्या मुहूर्तावर टाकलेला श्रीकार ठरला, कारण महादेवशास्त्र्यांनी दिशा दाखवून दिल्यानंतर त्यानंतर गेली शंभर वर्षे अॅव्हॉन नदीच्या पाण्याचा उपसा इथे मराठीचिये नगरी सतत चालू आहे. तेव्हा मराठीतल्या बुकीश नाटकांचं युग महादेवशास्त्री कोल्हटकरांनी सुरू केलं असं म्हणणं म्हणजे शास्त्रीबोवांवर उपकार ठरत नाहीत. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, की ज्यांची जन्मशताब्दी २९ जून ७१ ला कृतज्ञतेने साजरी झाली आहे. हे मराठीचे अव्वल दर्जाचे नाटककार आणि नाटककार गडकऱ्यांचे स्फूर्तिदाते गुरू. हे महादेवशास्त्री कोल्हटकरांचे पुतणेच. श्रीपाद कृष्णांचे चुलतबंधु चिंतामणराव कोल्हटकर. पुन्हा, हे जन्मजात

नाटकवाले. लेखनासकट नाटकाचं असं एकही अंग नाही, की जे मुरब्बी चिंतामण-रावांनी भूषविलं नाही. त्यांचेच चिरंजीव म्हणजे नट चित्तरंजन कोल्हटकर. त्यांचे आप्त बाळ कोल्हटकर. व्यावसायिक रंगभूमीच्या आखाड्यात हे दंड थोपटून आहेतच. दिलीप कोल्हटकर हा अंकूरही उगवतोय. सध्या खामगावला एकाकी म्हातारपण काढीत असलेले खुद्द श्रीपाद कृष्णांचे चिरंजीव प्रभाकरपंत हे सुद्धा नाटकवालेच. श्रेष्ठ गायक म्हणून भाऊराव कोल्हटकरांचं नाव आज पाच पिढ्या गाजत आहे. तात्पर्य : कोल्हटकर तेवढे समस्त नाटकवालेच. तोंडाला रंग फासणे आणि नाटकाची चोपडी लिहोणे हेच त्यांचे अवतारकृत्य ! श्रीपाद कृष्ण आज ह्यात असते तर ह्याचा सर्वात मोठा अभिमान सर्व प्रथम त्यांनाच वाटता. पण देहाच्या म्हणून काही आकलनीय मर्यादा आहेत. आणि नियतीच्या म्हणून काही अनाकलनीय शक्ती आहेत. त्यांचा विजय होणारच. झालाही पाहिजे. २९ जून १८७१ साली नागपुरास जन्म घेतलेल्या श्रीपाद कृष्णांनी १ जून १९३४ रोजी पुण्याला अवतारसमाप्ती केली. ह्या चौसष्ट वर्षांच्या जिंदगीतली उमेदवारीची पहिली पंधरा वर्षे आणि अखेरची भाकड पंधरा वर्षे, अशी तीस वर्षे वजा केली तर उरलेली मधली तीन तपांची त्यांची कारकीर्द ही साहित्यिक नाटकवाल्यांचीच ठरली. जगाच्या रंगभूमीवरची त्यांची भूमिका त्यांनी चोखच केली आणि विंगेत लुप्त होताना टाळी घेतली.

एवढ्या चार ओळी लिहून श्रीपाद कृष्णांच्या कृतार्थ कारकीर्दीला न्याय मिळणार नाही. साहित्यिक, विनोदवीर, कवी, नाटककार, टीकाकार, संभाषणपटू वगैरे असण्याच्याही पलीकडे असं त्यांच्यापाशी काही होतं. त्यांच्या मृत्यूला तीन तपं होऊन गेल्यानंतरही आज त्या अलौकिक अंशाच्या आठवणी मागे राहील्या आहेत.

एका अर्थानं श्रीपाद कृष्ण खरे भाग्यवान. कारण त्यांच्या काळातल्या मराठी साहित्यातल्या मानाच्या सर्व जागा त्यांच्यापाशी चालून आल्या. नुसत्या संमेलनाच्या अध्यक्षपदांबद्दल सांगत नाही. फार मोठ्या ताकदीच्या लेखनवीरांचं गुरुपण त्यांनी आत्मीयतेने केलं, आणि शिष्यवरांनीसुद्धा श्रीपाद कृष्णांचा वारसा सहर्ष सांगण्यात भूषण मानलं हे फार महत्त्वाचं आहे. म्हणजे कोल्हटकर हे त्यांच्या स्वयंभू घराण्याचे खलिफाच झाले. गडकरी, वरेरकर, कमतनूरकर, खांडेकर, माडखोलकर खानोलकर आणि कोल्हटकरांचे चिरंजीव प्रभाकरपंत, हे त्यांचे घराणेवाले सात प्रमुख शागिर्द. पैकी, गडकरी तर कोल्हटकरांची तसबीर पूजेसाठी सतत जवळ बाळगीत. तात्या म्हणजे गडकऱ्यांचे दैवत झाले होते. नाटक कंपन्यांच्या बिऱ्हाडा-तून मुक्काम करतानाही गडकऱ्यांनी श्रीपाद कृष्णांच्या तसबीरीची पूजा चुकवली नाही. मात्र जरी गुरुपणाच्या मानाची माळ त्यांनी कोल्हटकरांच्या गळ्यात अड-कवली असली तरी गुरुवर मात करण्याची त्यांची आकांक्षा ते मित्रमंडळीत अभि-

मानाने सांगायचे, ' मी अशी नाटकं लिहीन की गंधर्व मंडळीचा मी रविवारचा नाटककार होईन आणि गुरुवर्य श्रीपाद कृष्णांना बुधवारचा नाटककार व्हावं लागेल. '

श्रीपाद कृष्णांच्या हयातीतच त्या महत्त्वाकांक्षेचं प्रत्यंतर आलं. ' एकच प्याला ' नाटक लागल्यानंतर तो सोन्याचो खाण ठरलेला खेळ सतत रविवारी होऊ लागला आणि कोल्हटकरांची नाटकं बुधवारी लागून अखेर लागायचीही बंद झाली. ' वधू-परीक्षा ',' मूकनायक ',' गुप्तमंजूषा ' ' मतिविकार ' वगैरे तात्यांच्या नाटकांची फक्त नावंच काय ती आता उरली आहेत. ' शिवपावित्र्य ' नावाचं छत्रपतींच्या नक्षत्रलख्ख चारित्र्यावर लिहिलेलं नाटक त्यांच्या खात्यावर जमा आहे ह्याचा फारसा कुणाला पत्ताही नाही. पण शिष्यांकडून पराजय झाल्याचं शल्य श्रीपाद कृष्णांच्या उदार काळजाला बोचत राहिलं नाही. एक तर मराठीतल्या विनोदी लेखनाची गंगोत्री म्हणून त्यांच्या ' सुदाम्याचे पोहे ' ह्या पुस्तकाकडे पाहिलं गेले, त्यामुळे त्यांना कृतार्थ वाटत होते. शिवाय गडकऱ्यांचा भाग्यरवि उदय पावण्याच्या अगोदरच्या काळात किर्लोस्कर आणि गंधर्व मंडळीमधली नाटककाराची सन्मान्य गादी तात्यांसाठी सदैव अंथरून ठेवलेलीच असायची. साहेबाच्या शिफारसपत्रावर नेटीव लेखकांच्या गुणवत्तेची कुंडली मांडणाऱ्या शिष्ट टीकाकारांसाठी एक किस्सा: गुणाढ्य आंग्ल कादंबरीकार ई. एम. फोर्स्टर ह्यांना केंब्रिज मुक्कामी सुदाम्याच्या निवडक पोह्यांचा अनुवाद वाचावयास दिला असता संतुष्ट होता तो साहेब म्हणाला, कोल्हटकर हे जागतिक दर्जाचेच लेखक आहेत !

चेहेऱ्याचा पक्षघात, ओला इसब आणि नेत्रदोष ह्यामुळे तात्यासाहेब पिडलेले असत. त्यामुळे ये-जा करण्याशिवाय गत्यंतर नसलेल्या मोठ्या गावातून वकिली-करणं त्यांना अशक्य झालं. जळगाव-जामोद, खामगाव, तेल्हारा वगैरे किरकोळ कोर्टांच्या गावी त्यांनी नाममात्र वकिली केली. पैसा मिळवला पण वकिलीत त्यांचा जीव रमला नाही. उभ्या हयातीत त्यांनी कधी खोटा कज्जा चालवला नाही. कोर्टाला पडणाऱ्या रजेकडे त्यांचा सतत डोळा असे. रजा पडली की ते थेट मुंबईला येत. सुरुवातीला त्यांचा मुक्काम केळेवाडीतल्या जुन्या सोमण चाळीत नातेवाईकां-कडे असे. नंतर साहित्य संघाच्या डॉ. भालेरावांची आणि त्यांची ओळख झाली. डॉ. भालेराव त्या काळात ' अरविंद ' नावाचं मासिक चालवीत आणि हौशी कथा-लेखनही करीत. ते घरचे श्रीमंत, मनाचे अगत्यशील आणि साहित्यिकांच्या आदर-सत्कारात पाऊल सतत पुढे असलेले असे होते. तात्यांना जिव्हालौल्य अफाट. डॉ. भालेरावांच्या घरी गोडधोड खाण्याची चंगळ असे. त्यामुळे नंतरच्या काळात कोल्हटकरांची मुंबईतली वस्ती नेहेमीच विठ्ठलभाई पटेल मार्गावरच्या भालेरावांच्या घरीच असे. कोल्हटकर कधीही एकटे नसत. विनोदी किस्स्यांचा त्यांच्यापाशी खजिनाच असल्यामुळे चहात्यांची नेहेमी तिथे थप्पीच लागलेली असायची. माड-

खोलकर, वि. ह. कुलकर्णी, वि. सी. गुर्जर, गं. दे. खानोलकर वगैरे मंडळींचा ताफाच त्यांच्या आवतीभोवती असायचा. तात्याही सर्व मंडळींना समान आप्त-भावाने वागवायचे. सर्वांची यथेच्छ चेष्टा करायचे. एकदा माडखोलकर कवि माधवांना घेऊन कोल्हटकरांकडे गेले. कवींची आणि श्रीपाद कृष्णांची ओळख करून द्यावी हा त्यांचा हेतु. कवींना पाहून कोल्हटकर म्हणाले,

'ओळखीची काय जरुरी आहे ? आपण पूर्वी भेटलेलो आहोत.'

'नाही हो, आपण भेटलेलो असणं कसं शक्य आहे ? आपण प्रथमच भेटत आहोत.' कवि माधव.

'नाही. मी तुम्हांला ह्यापूर्वी नक्कीच पाहिलेलं आहे.'

'शक्यच नाही. कुठे पहाणार तुम्ही मला ? तुम्ही वऱ्हाडात. मी इथे मुंबईत.'

'मग मी कदाचित तुमचा फोटो पहिला असेन."

'तेही अशक्य आहे, कारण माझा फोटोच काढलेला नाही.'

'असं म्हणता ? मग कदाचित मी तुमच्यासारखा दिसणारा एखादा माणूस पाहिलेला असेन !'

तात्यांचा हा निर्मळ विनोद होता. कवि माधवांना तो भावला नाही. त्यांनी डोक्यात राख घातली.

मनाने कोमल आणि वृत्तीने कळकळीचे असल्यामुळे शिष्यांचं आणि इतर नवोदितांचं कच्चं आणि पक्कं लिखाण शब्द न् शब्द लावून वाचण्यात त्यांचा बराच वेळ जाई. माडखोलकरांच्या 'आधुनिक कविपंचक' ह्या पहिल्या पुस्तकाचं पहिलं प्रकरण त्यांनी असंच ओळ नि ओळ वाचून दुरुस्त्या सुचवून पाठवलं होतं. अखेर डोळे काम करायचं नाकारीपर्यंत त्यांच्या टेबलावर नवीन लेखकांच्या कथा, कादंबऱ्या, नाटकांची हस्तलिखितं सदैव पडलेली असत आणि न कंटाळता ते सर्वांना आत्मीयतेने सल्ला देत असत. ह्या त्यांच्या अगत्यशील आणि हितैषी वृत्तीमुळेच हिराबाई पेडणेकर ह्या मराठीतल्या पहिल्या स्त्री-नाटककार त्यांच्याकडे आकर्षित झाल्या. हिराबाईंना नाट्यलेखनातला सल्ला आणि थोर श्रीपाद कृष्णांनीच दिला आणि नाट्यगीतांच्या नव्या नव्या चाली आणि नंतर दीर्घकाळची निष्ठायुक्त सोबत हिराबाईंनी श्रीपाद कृष्णांना दिली, हा इतिहास आहे. श्रीपाद कृष्णांनी आपल्या वडील बंधूंच्या संमतीने मुंबईच्या हिराबाईंचे बिऱ्हाड खामगावात मांडून दिले होते. हाही इतिहासच आहे. पुढे, हा सुधारक नाटककार ब्राह्मण आपणाला खाजगी जीवनात सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याइतका झुंजार आणि बेडर पुरुष नाही, ह्याची कडवट प्रचिती आल्यामुळे खंतावून पेशाने कलावंतीण असलेली ती व्याकूळ गुणी हिराबाई मागे फिरली आणि कोकणातल्या गुहागर गावी कुंकू लावून कॅन्सरने मेली—हासुद्धा इतिहासच आहे ! दुर्दैवाने, ह्या सर्व प्रकरणाबद्दलचा मजकूर तात्यांनी आत्मचरित्रात लिहिलेला असूनही प्रसिद्धीच्या वेळी गाळून टाकला.


ह्यामुळे त्यांचं आत्मचरित्र काहीसं भुंडं झालं आहे. वरवर पाहता ती एक नाटककंपन्यांबरोबर केलेल्या आर्थिक व्यवहारांची प्रदीर्घ खतावणीच वाटते.

श्रीपाद कृष्ण हे पट्टीचे गायक होते. जळगाव—जामोदला बालाजीच्या मंदिरात पाचलेगावकर महाराजांचे कीर्तन झाले, त्या वेळी श्रीपाद कृष्ण गायल्याचीही एक आठवण आहे. मात्र ते खुल्या गळयाने गात नसत. गायनाचा त्यांचा आवाज चोरटा असे. त्यांचं 'महाराष्ट्र गीत' त्यांनीच सरगम करून बसवून दिलं होतं. त्यांचं तालज्ञान सूक्ष्म असल्यामुळे 'पटवर्धन' नाटकाची पदे करीत असताना आणि नंतर त्यांच्या चाली बांधीत असताना गोविंदराव टेंब्यांसारख्या जयपूर गायकीचा गंडा बांधलेल्या सराईत संगीतज्ज्ञानेसुद्धा श्रीपाद कृष्णांची मदत घेतली होती. 'मानापमाना'च्या गर्भरेशमी चाली ज्या गोविंदराव टेंब्यांनी बांधल्या, त्यांनासुद्धा चालींसाठी श्रीपाद कृष्णांची मदत घ्यावी लागावी आणि त्यासाठी कोल्हापूरहून मुंबईला मुक्काम करावा लागावा, ह्यात तात्यांच्या गायननैपुण्याची पावतीच मिळते. एवढंच कशाला, नाटयसंगीताचा सूर्य म्हणून ख्याती पावलेल्या भाऊराव ऊर्फ भावड्या कोल्हटकरांनासुद्धा श्रीपाद कृष्ण मारीत त्यातल्या काही अवघड ताना मारणे जमत नसे, असा लेखी पुरावा आहे! तात्यांनी बांधलेल्या नाटयगीतांच्या चाली ही संगीत रंगभूमीला मिळालेली अभिजात देणगी आहे, असं आज मानलं जातं. मात्र 'उगिच कां कांता' हे एक पद सोडल्यास त्यांचं दुसरं कुठलंच पद कुणाच्याही जिभेवर रेंगाळल्याचं दिसत नाही. गोविंदराव टेंब्यांच्या 'मानापमाना'च्या चाली पं. भास्करबुवा बखल्यांच्या 'स्वयंवर'च्या चाली किंवा बाई सुंदरबाईच्या, 'एकच प्याला'च्या चाली आजतागायत रसिकांच्या श्रुति धन्य करीत आहेत. ते भाग्य श्रीपाद कृष्णांच्या वाटयाला आलं नाही.

श्रीपाद कृष्णांच्या 'मतिविकार'च्या प्रयोगाला लोकमान्य आले होते. नाटक पाहून ते फार नाराज झाले, आणि उद्गारले, 'काय हा बुद्धीचा दुरुपयोग चालवला आहे नाटककाराने! हा आपल्या बुद्धीचा सदुपयोग करील तर किती नामी गोष्ट होईल.' नाटककाराने हे कष्टी बोल थंडपणे ऐकून घेतले. कारण त्याला ज्योतिर्गणीताचंही उत्तम ज्ञान होतं. पुढे, श्रीपाद कृष्ण ज्योतिष संमेलनाचे लोकमान्यांच्याच शिफारशीवरून अध्यक्ष झाले. त्या अध्यक्षीय भाषणांत त्यांनी निस्पृहपणे लोकमान्यांच्या गणितातल्या उणीवा त्यांना दाखवून दिल्या.

गडकऱ्यांच्या उदयाच्या अगोदरच्या काळात श्रीपाद कृष्णांची नाटकं मनपसंत धंदा करीत होती. त्यातून त्यांनी बारा हजार रुपयांची खामगावला घरवाडी केली. पुढे पैसे आले ते जमिनीत घातले. दुष्काळामुळे त्यातून नीट पैसा सुटेना. पुढे पुढे त्यांची सगळीच नाटकं पडायला लागली. त्यामुळे रॉयल्टीही येईना. इतर अवांतर लेखन हे धनोत्पादक नव्हते. 'सुदाम्याचे पोहे'च्या पहिल्या संपूर्ण आवृत्तीचे तात्यांना प्रकाशकाने फक्त पंचवीस रुपये मोबदला म्हणून दिले अशी त्यांच्या

आत्मचरित्रात ठळक नोंद आहे! तेही पंचवीस रुपये त्यांच्या खिशात न पडता लक्ष्मण गणेशशास्त्री लेले प्रकाशित करीत असलेल्या 'अभिनवकाव्यमाला'च्या आवृत्तीत स्वतःच्या आणि केशवसुतांच्या कविता घालण्यासाठी परस्परच पाठवुन देण्यात आले. प्रकृतीही चिरचिरी झाली होती. वकिलीही ढासळत होती. विलायतच्या वारीचा बेत कोलमडला होता. गडकरी ह्या गुणी शिष्याचा मृत्यूही डोळ्यांसमोरच झाला होता. हिराबाईही फार दूर गेल्या होत्या. शेवटी, पैसा नाही, आरोग्य नाही, रंगभूमीवर यश नाही, हात काम देत नाही, अशी विपरीत परिस्थिती आली. फक्त स्तुती बेफाट होत होती. त्या शाब्दिक स्तुतीचं डबोलं घेऊन ते आपलं रोगीट आयुष्य नागपुराला बंधूंच्या छायेत काढू लागले. कर्जवाम काढणार नाही, व्याजबट्टा करणार नाही, खोटा कज्जा लढवणार नाही, लाच देणार नाही की घेणारही नाही अशी नकारात्मक आणि सर्वांशी समान आप्तभावाने वागेन, नव्या लेखकांना प्रोत्साहन देईन, अशी होकारात्मक मूल्ये जपण्यात त्यांनी आयुष्याची सायंकाळ काढली. अखेरीला त्यांना भयानक क्लेश झाले. दृष्टीचे मांद्य आले. पक्षघाताचा जोरदार झटका आला. जीभ लुळी पडली. इसब पसरला. ते नुसते बिछान्यावर निपचीत पडून रहायचे. कुणी काही वाचून दाखविले तर ऐकायचे. असा शांत, थंड ऱ्हासकाल भोगीत ते मग एके दिवशी पंचतत्त्वात विलीन झाले. साहित्याच्या जगातले सर्व मानसन्मान भोगलेल्या श्रीपाद कृष्णांवर काळाने सूड हा असा ऐन अखेरीला उगवला. पण जाता जातासुद्धा कोल्हटकर घराण्याची मान ताठ राहील असं नाट्यकलेतलं मोक्याचं स्थान भूषवून आणि अमोघ कर्तबगारी बजावून ते काळाच्या पडद्याआड गेले. मराठी रसिकतेवर तर त्यांचे उदंड उपकार आहेत. म्हणून त्यांच्या जन्मशताब्दीचा हा उमाळा!



सु. ल. सोमण

# अमेरिका–हादरलेलं शासन !

'न्यूयॉर्क टाईम्स 'नं अमेरिकन शासनाला जबरदस्त धक्का दिला आहे. 'पेटॅगॉन ' ह्या लष्करी वरिष्ठांच्या संस्थेच्या ' अत्यंत गुप्त ' संशोधन-फाईलीमधून काही कागदपत्रांच्या प्रति ' न्यूयॉर्क टाईम्स 'ला मिळाल्या. विएतनाम युद्ध-प्रकरणांवर नवा प्रकाशझोत टाकणारा हा मजकूर ' न्यूयॉर्क टाईम्स 'नं धुम-धडाक्यात प्रकाशित करायला सुरुवात केली. दुसऱ्या महायुद्धानंतर, विएतनाम विरुद्ध दडपशाही करण्यांत फ्रेंचांना मदत करण्याचा निर्णय, नंतर हो चि मिन्ह सरकारशी जुळवून घेण्यात आलेलं अपयश, ट्रुमन व नंतर आयसेन हॉवर-केनेडी काळातलं विएतनाम प्रश्नांत अमेरिकेला अधिकाधिक गुंतवून टाकणारं धोरण जॉन्सन काळात भडकलेली युद्धाची प्रखर व्याप्ति, मधून मधून बॉम्बफेक थांबव-ण्याचं लोकांच्या डोळयात धूळ फेकणारं धोरण–इत्यादि अनेक अमेरिकन चुकांवर, युद्ध भडकावण्याबाबत अमेरिकन शासनाचा, पेंटॅगॉनचा असलेल्या पुढाकारावर प्रखर झोत ह्या प्रकाशनांनी फेकलेला आहे ! ह्या प्रकाशनांनी अमेरिकन शासनाची ' पेंटॅगॉन ' ची झोप न उडती तरच नवल ! आधीच विएतनाम युद्ध विरोधी वातावरण अमेरिकेत तापत आहे. रोज येणाऱ्या युद्धाच्या, पराभवाच्या बातम्या, त्यानिमित्ताने होणारी लाखो अमेरिकन तरुणांच्या जीवनाची होळी, वाढत्या समस्या, वाढती बेकारी, घसरता डॉलर–ह्या साऱ्यांच्या मुळाशी कुठेतरी विएतनाम युद्ध आहे, ही बाब अमेरिकन जनतेच्या मनात आता खोल रुतली आहे ! तो असंतोष तिथे खदखदतो आहे !! निवृत्त सेनाधिकारी, विएतनाममध्ये काम केलेल्या नर्सेस, सिस्टर्स व इतरांच्या माहितीमुळे ह्या असंतोषाला खतपाणी मिळत आहे. कु. मेरी मॅक्नामारा ह्या परिचारिकेनं नुकतंच सांगितलं की, ' विएतनाम युद्धावरून परत-णारे तरुण, सैनिक कुचकामी झालेले आढळतील. सक्त व्यसनी बनलेले आढळतील. चरस आणि गांजा ह्यांच्या ते इतके आधीन झालेले आढळतील की त्यांचा राष्ट्राला काडीचाही फायदा होणार नाही...' मिस् मॅक्नामारा ह्या गेली बरीच वर्षे सायगाव-मध्ये होत्या. ह्या अनेक प्रश्नांनी खतपाणी घालून पोसलेला युद्ध विरोध, ह्या गुप्त कागदपत्रांच्या प्रकाशनांनी अधिक उग्र होईल, भडकेल असं शासनाला वाटणं अगदी

साहजिक आहे.

आणि म्हणूनच, ह्या कागदपत्रांच्या प्रकाशनाला, पुढील लेखांकांना निक्सन-शासनाने बंदी केली. ' न्यूयॉर्क टाईम्स 'नी विएतनाम युद्ध विरोधी वातावरण तापविण्यात प्रथमपासूनच पुढाकार घेतला होता. ह्या प्रकाशनामुळे त्यांनी नवीन आघाडी प्रस्थापिली होती. अर्थातच, शासकीय बंदीला त्यांनी भीक घातली नाही. ' व्हाईट हाऊस 'ने ह्यांतून मार्ग म्हणून कोर्टाकडे धाव घेऊन तात्पुरता मनाई हुकूम ' न्यूयॉर्क टाईम्स 'वर लादला. खालच्या कोर्टात ह्या संबंधात सुनावणी होऊन, ह्या गुप्तपत्रांच्या प्रकाशनाला हरकत घेतली जाऊ नये असा निर्णय दिला गेला. तथापि वरिष्ठ कोर्टात हा निर्णय फिरवला गेला. ' न्युयॉर्क टाईम्स 'लाही लेखमाला तूर्ततरी बंद करावी लागली आहे. परंतु ही बंदी येण्यापूर्वीच प्रकाशित झालेल्या लेखांनी आपली कामगिरी चोख बजावली आहे. शासनाला तर त्यांनी गदगदा हलवून सोडलंच, पण सामान्यजनांच्या भावनांनाही हात घातला आहे. स्थानिक व परदेशी विचारवंतांनी, पुढाऱ्यांनी, पत्रकारांनी म्हणूनच ह्या बंदीविरुद्ध आवाज उठवला आहे. विएतनाम युद्धातल्या कृत्याबद्दलचं खापर अमेरिकेवर फोडायला सुरुवात केली आहे. घरच्या-दारच्या ह्या दडपणापुढे आतातरी अमेरिकेला हमखास मान तुकवावीच लागेल. टीकेचं मोहोळ तीव्र होण्यापूर्वीच निक्सन-शासन विएतनाम-मधून काढता पाय घेण्याची घाई करील असं म्हणूनच अनेक राजकीय भाष्यकारांना वाटतं !

लोकशाही राजवटीत, निर्भिड स्वतंत्र वृत्तपत्रे काय करू शकतात ह्याचंही एक उत्कृष्ट दिग्दर्शन ' न्यूयॉर्क टाईम्स 'नं घडवलं आहे. प्रत्यक्ष युद्ध काळात फल-टणींच्या हालचालींसंबंधीची गुप्त सैनिकी माहिती वृत्तपत्रांनी प्रसिद्ध करू नये किंवा तत्सम माहिती देऊ नये हे राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचं आहे. तथापि, पूर्वी काय घडलं किंवा ज्या प्रश्नाचे गंभीर परिणाम राष्ट्रजीवनावर घडत आहेत त्या प्रश्नाच्या मुळाशी काय होतं हे, ( कितीही गुप्त फायलीतून घेतलेल असलं तरी ! ) सांगणं, जाहीररित्या प्रकाशित करणं ह्यांत काहीच वावग नाही ! राष्ट्रीय संरक्षणाला त्यामुळे बाध येणंही शक्य नाही. उलटपक्षी त्यापासून राष्ट्राचा फायदाच व्हायची शक्यता आहे. आपणच निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी आपलीच कशी घोर फसवणूक केली ह्याची जाणीव जनतेला असणं लोकशाही राजवटीत आवश्यक आहे ! राष्ट्रीय संरक्षण, परराष्ट्र संबंध इत्यादींवर विपरीत परिणाम होऊ नयेत म्हणून ह्या गुप्त पत्रकांच्या प्रकाशनावर बंदी घालावी लागत आहे. हा अमेरिकन शासनाचा दावा म्हणूनच लटका वाटतो !

ही गुप्त पत्रकं ' न्यूयॉर्क टाईम्स 'ला कशी मिळाली हेही कोडं पेंटॅगॉनला पडलं आहे. त्यासाठी चौकशी मंडळाची नियुक्ती झाली आहे. एफ्. बी. आय्. ह्या अमे-रिकन गुप्तहेर संघटनेकडेही चौकशीचं काम सोपवलं गेलं आहे. सरकारचे लष्कर-

विषयक माजी सल्लागार डॅनियल एल्सबर्ग ह्यांच्यावर बऱ्याच जणांचा संशय आहे !

–काही निरिक्षकांच्या मते डेमॉक्रॅटसच्या चुकांना प्रसिद्धी देऊन रिपब्लिकनांचा मार्ग मोकळा करण्यासाठी काही सिनेट सदस्यांनी व सरकारी प्रतिनिधींनीच गुप्त पत्रकं प्रसिद्ध करण्याचा बनाव केला असावा !

–अमेरिकेतल्या ह्या उत्पातांचा फायदा घेऊन देशातले कम्युनिस्ट्स, चिनी रशियन शासन अमेरिकेवर नवा भडिमार सुरू केला आहे ! अमेरिकेतल्या लोकशाहीमुळे ह्या अमेरिकन चुका उघडपणे चर्चिल्या तरी जाऊ शकताहेत ! पण रशियानं हंगेरीत, झेकोस्लाव्हाकियात, पोलंडमध्ये काय केल ह्याचा इतिहास तरी कधी उजेडात येईल का हे, हे 'जनतेच्या स्वातंत्र्याचा आवाज उठवणारे' कम्युनिस्टस् कधी सांगतील का ?

## भारतीय उपखंड–टॉयेन्बी उवाच !

डॉ. अर्नॉल्ड टॉयेन्बी हे प्रख्यात ब्रिटिश राजनितिज्ञ आहेत ! इतिहासकार आहेत !! त्यांच्या विचारांना, राजनैतिक भाकितांना म्हणूनच नैतिक वजन आहे. 'आसाही शमवुन' ह्या जपानी वृत्तपत्राला टोकियोला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी अनेक चालू घडामोडीवर भाष्य केलं, ते म्हणूनच विचारात घेण्यासारखं आहे. त्यांच्या भाष्याचा सार–

' ब्रिटिश राज्य गेल्यानंतर भारतीय उपखंडांत भाषिक चळवळींना ऊत आला. 'बांगला देश' हा त्यातलाच एक भयानक प्रकार आहे. तत्पूर्वी भारतीय राज्यसंघातही अनेक भाषिक चळवळी झाल्या. भाषावार प्रांत रचनेनं भारतीय नकाशाचं मूळ स्वरूप बदलून टाकलं. द्राविडी प्रांतातनं हिंदी विरोधाचा आगडोंब उसळला... पूर्व बंगालमध्ये बंगाली भाषा व लिपीवरून उद्रेक गाजले. प. पाकिस्तानांत सिंधी, पठाण, बलुची जमातींनी पंजाबी आणि उर्दू वर्चस्वाविरुद्ध आवाज उठवले... सिलोन मधल्या उठावाच्या मुळाशीही प्रायः बहुसंख्य सिंहली विरुद्ध अल्पसंख्य तामिळी असाच संघर्ष आहे...म्हणूनच भारतीय उपखंडात शांतता नांदायला हवी असेल तर, अनेक भाषिक राज्ये असलेलं (धार्मिक नव्हे !) भारत-पाक-सिलोन ह्यांचं एकच एक असं संघराज्य हाच माझ्या मते एकमेव उपाय आहे...'

इतर आशियायी देशांकडे वळून ते म्हणतात, '...जपान व चीन हे अधिकाधिक जवळ येतील तर, जपान अमेरिका संबंध दुरावतील...चीनचं नशीब सर्वांत बलवत्तर आहे असं मी म्हणेन. चीन लौकरच, मॉंच्युरियन कालांतल्या वैभवाप्रत पोचेल तर, रशिया, अमेरिका, युरोप आदि राष्ट्रे मागे पडून युरोपीय उत्थापनापूर्वीच्या अवस्थेत जाऊन पडतील...'

# जग नंतर, चंद्र आधी शांत ठेवा !

जगातली तणातणी कुठेही कमी होताना दिसत नाही. प्रश्न सर्वत्र चिघळत आहेत. शीतयुद्धही जारी आहे. अवकाश संशोधनाची व त्या द्वारे सामर्थ्य वाढवण्याची बड्यांची स्पर्धा चालू आहे. मात्र अशा स्पर्धाद्वारे विरुद्ध राष्ट्रांवर हेरगिरीही करता येते, कदाचित अवकाशातनं विरुद्ध राष्ट्रावर वर्चस्वही मिळवणं शक्य होईल ह्या भीतीनंही ही बडी राष्ट्रं ग्रासलेली दिसतात. रशियाचं अंतराळस्थानक अंतराळात स्थिरस्थावर होऊन, तिथे त्याला सोयुझ ११ ह्या अंतरिक्षयानानं गाठलं आहे. तिथे प्रयोगशाळा सुरळीत काम करीत असून, तिघे अंतरिक्ष याची संशोधनही करीत आहेत. एकीकडे अतराळात ही विक्रमी झेप घेत अनतानाच सोविएत परराष्ट्र मंत्री आन्द्रेची ग्रोमिको ह्यांनी 'युनो'पुढे मांडण्यासाठी एक प्रस्ताव से. जनरल उ थांट ह्यांच्याकडे पाठवला आहे. ह्या प्रस्तावातली कलमं चंद्र शांत ठेवण्यासाठी आहेत. नि ती अशी–

१. चंद्रावर शक्तीप्रदर्शनाला किंवा संहारक अस्त्रांच्या वापराला बंदी असावी. त्याचप्रमाणे चंद्रावरून अशा अस्त्रांच्या सहाय्याने पृथ्वीवरील कुठल्याही राष्ट्रावर कृती करण्याला बंदी असावी.

२. सर्व राष्ट्रांनी चंद्राचा उपयोग शांततेसाठीच करावा.

३. चंद्रावर लष्करी तळ उभारण्यास, अण्वस्त्र चाचण्या वगैरे करण्यास बंदी असावी.

४. चंद्रावरील वातावरणात प्रतिकूल बदल घडवून आणण्यास किंवा तिथली हवा दूषित होईल असे काही करण्यास बंदी असावी.

५. चंद्रावरील मानवी जीवन सुरक्षित असावं.

६. चंद्र कुठल्याहीं व्यक्तीची, राष्ट्राची, राज्याची मालमत्ता बनू शकणार नाही.

७. चंद्राचा शांततामय कार्यासाठी उपयोग करण्यासाठी कोणतेही राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राच्या आड येण्यास बंदी असावी.

◻ ◻ ◻

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## अति दाट वस्तीचे हे शहर

१९७१ च्या शिरगणतीनुसार कलकत्ता शहराची लोकसंख्या ७०,४०,३४५ इतकी आहे. संख्या पाहून साहजिकच चिंता निर्माण होते. कुटुंबनियोजनाच्या प्रसाराचा परिणाम फारच अल्पांशाने दिसून आला हे सिद्धच आहे. त्यामुळे कलकत्त्यातील वाढती लोकसंख्या म्हणजे एक मोठीच समस्या निर्माण झाली आहे. समाजाच्या अगदी खालच्या थरातील जास्तीत जास्त लोकांचे जीवन अत्यंत कठीण आहे. राहावयास घरे पुरेशी नाहीत. झोपडपट्ट्या अस्ताव्यस्त पसरत आहेत. पाणी पुरवठा सदोष आहे. रस्ते आणि गल्ल्या तोडमोड झालेल्या अवस्थेत, भर रस्त्यावर सांचलेले कचऱ्याचे ढीग, अपुरी वाहने, सुसज्ज नसलेले दवाखाने आणि शाळा, मोठ्या प्रमाणात भेसळ केलेले खाद्य पदार्थ, अनियमित दूधपुरवठा, करमणुकीच्या साधनांची कमतरता, उघडी पडलेली गटारे ह्या सर्व गोष्टींनी कलकत्त्याचे अगोदरचे चकचकीत चित्र पार पुसून टाकले आहे. लोकसंख्येत भरमसाट वाढ झाल्यामुळे शहरातील प्रचलीत व्यवस्था, (जर सुधारणेचे चांगले मार्ग शोधून न काढले तर) कोसळून पडण्यास वेळ लागणार नाही.

आता कलकत्ता इंप्रुव्हमेंट ट्रस्ट, CMDA व कार्पोरेशन ह्या सर्वांनी मिळूनच हा गाडा ओढावयास हवा. आत्मसंतुष्ट वृत्ति ठेवून चालणार नाही. ती घातक असते. समाजाच्या वरच्या थरातील लोक जरी सुस्थितीत राहू शकले तरी फार मोठ्या लोकसंख्येला जीवनाच्या आनंदापासून वंचित ठेवले जाईल व परिणामतः भवितव्यात सारा अंधारच अंधार दिसून येईल. शिरगणतीचा आकडा म्हणजे एक तातडीची सूचनाच आहे, तिकडे दुर्लक्ष करणे म्हणजे असहायता ओढवून घेणेच होय !

## गंमत ' कंपोझिंग 'ची !

एका विख्यात मुद्रण कार्यालयाने एकदा जाहिरात दिली की त्यांच्या ' कंपोझिंग रूम 'चा चार्ज घेण्यासाठी माणसाची गरज आहे. लागलीच अर्ज येऊ लागले. अर्जांचा

ढीग जमला. एक अर्ज एका उत्तम गुणविशेष असणाऱ्या माणसाचा होता. तो डबल एम्. ए. होता. पीएच्. डी. करणार होता. संशोधनाचा अनुभवही थोडाफार गाठीशी होता. समाजकार्य त्याने करून पाहिले होते. मासिकाचे संपादन केलेले होते आणि थोडेसे लेखनही तो मधून मधून करीत होता. त्यानंतर आपल्या संगीताच्या ज्ञानाचेही त्याने भरपूर विवेचन अर्जात केले होते. त्याला सर्व प्रकारची वाद्ये हाताळता येत होती. भारतीय व पाश्चिमात्य संगीताचे त्याला विस्तृत ज्ञान होते व थोडी कीर्तीही त्याने मिळवली होती.

आलेले अर्ज वाचून पाहणारा माणूस हा विचित्र अर्ज पाहून गोंधळून गेला. ह्या नोकरीसाठी संगीत क्षेत्रातील योग्यतेचा उपयोग काय हेच त्याला कळेना. 'नापसंत' गठ्ठ्यात तो अर्ज टाकता टाकताच त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. अर्ज करणाऱ्या माणसाने ' कंपोझिंग ' ह्या शब्दाचा अर्थ संगीतरचना असा केला असावा व म्हणून ही गफलत झाली असावी.

## श्रीमंतांच्या आगळ्या हौशी

एका गरीब कुटुंबाचा एक लांबचा नातलग खूप श्रीमंत होता. हौशीखातर तो कधीमधी ह्यांच्या दोनखणी घराला भेट देई. तो येताच त्याची सरबराई करावी लागे. असाच एकदा तो आला होता. घरातल्या गृहिणीशी बोलू लागला. हातातली अंगठी दाखवीत म्हणाला –

" वहिनी, ही अंगठी कशी वाटते ?"

" छान आहे की. तुमच्या अंगठीला काय पाहायचंय्. "

" अहो वहिनी, ही पितळेची अंगठी आहे. "

" चला. थट्टा करता की काय ? तुमच्या हातातली अंगठी पितळेची का असणार आहे ?"

" खरंच आहे. ही बघा. "

अंगठी काढून वहिनीच्या हातात दिली जाते. ती दिसायला जाडजूड पण वजनाने हलकी लागते. शिवाय निरखून पाहताच चकाकी निराळी वाटते. वहिनीलाही संशय येतो. तिच्या चेहऱ्यावर त्याचं प्रतिबिंब उमटतं. पण तोंडून शब्द निघत नाहीत. मग तेच गृहस्थ बोलू लागतात –

" अहो वहिनी, ही पितळेची अंगठी मी बारा आण्याला घेतली आहे. पण माझ्या बोटात चढल्यावर तिला सोन्याची किंमत प्राप्त झालीय्. अहो, माझ्या हातात पाहिल्यानंतर ही अंगठी पितळेची आहे असं म्हणायची कोणाची हिंमत होईल काय ?"

यावर वहिनी म्हणतात–" खरं आहे हे ! तुमच्या हातातल्या पितळेच्या अंगठी-लाही ती सोन्याचीच आहे असं म्हणतील. पण आमच्यासारख्यांनी सोन्याची अंगठी घातली तरी ती पितळेची तर नाही ना म्हणून लोक संशयाने बघतील. जग हे असच आहे !"

ही घटना आठवली ज्यावेळी अशाच तऱ्हेची एक कथा वाचण्यांत आली. ती कथा अशी –

कलकत्त्यात एक अत्यंत श्रीमंत असा अविवाहित तरुण आहे. त्याच्याजवळ चाकू-काटे-चमचे ह्यांचा खूप मोठा संग्रह आहे–इथं संग्रह हा शब्दच वापरावा लागेल. कारण जेव्हा जेव्हा तो रेस्टॉरंटमध्ये खाण्यासाठी जातो तेव्हा त्याचे बिल आणणाऱ्या नोकराला तो उदारहस्ते ' टिप ' देऊन त्याला घालवतो. तो नोकर सारखे सलामावर सलाम ठोकीत आपल्या दोस्त मंडळींना ' टिप ' बद्दल सांगण्यास निघून जातो. एका अत्यंत उदार हृदयाच्या फार मोठ्या माणसाला वाढण्याचे काम आपण केले असे ह्याला वाटू लागते. एवढ्या वेळात तो मोठा माणूस हाताला लागतील तेवढे सुऱ्या-काटे-चमचे खिशांत टाकतो आणि निघून जातो. आपल्या हातचलाखी-वर तो मनोमन खूष होतो आणि तो अत्यंत श्रीमंत असल्यामुळे त्याचे हें कृत्य चोरीच्या सदरात जमा होऊ शकत नाही. अं: ! केवळ गंमत म्हणून तो गृहस्थ असे करतो असाच त्याचा अर्थ लावण्यात येतो.

अति श्रीमंत लोक कोणत्या वेळी कसे वागतील याचा नेम नसतो अन् आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांचे ते वागणे कौतुकास्पदच ठरत असते !

## आमच्या वाचकांकडून

एकदा स्टेट्स्मनच्या ऑफिसात एका तरुणाचा एक अर्ज आला. आपल्याला वार्ताहराचे काम मिळावे म्हणून त्याने अर्ज केला होता. कारण स्टेट्स्मन मध्येच त्याचे बरेचसे लेखन प्रसिद्ध झालेले आहे म्हणे !...

खरंच ?...होय, ' प्रिय संपादक...' ह्या सदरात !

◻ ◻ ◻

## मराठा मंदिर
## नवा उपक्रम

प्रतिनिधी

# बेकारी निरोधन संघ

'गरीबी हटाओ', 'समाजवाद' अशा चटकन् प्रसिद्धी मिळणाऱ्या घोषणांचे हे दिवस. सारखे वापरून हे शब्द अगदी गुळगुळीत होऊनही त्यांचा भाव मात्र कायम आहे आणि त्याच्या जोरावर निवडणुकाही जिंकता येतात हा आपला अगदी अलीकडचा अनुभव.

झाडून सारे पक्ष, संस्था आदर्श समाजाचे नारे उच्चरवाने ओरडत आहेत. सुख-समृद्धीची प्यारी प्यारी चित्रे रंगविणे हा त्यांचा धंदा होऊन बसला आहे. पण वास्तव-तेशी त्याचा काडीचाही संबंध नाही. राजकीय, आर्थिक व सामाजिक मिरासदारी वाढत असून काही थोडया लोकांच्या हातात या तिन्ही आघाडयांची सत्ता आहे. सामान्य माणूस त्या मिरासदारीमुळे पिजून निघाला असुन त्याच्यात आता प्रति-काराची शक्तीही कमी होत चालली आहे.

प्रचंड लोकसंख्या आणि बेकारी अशी आजची अवस्था आहे. अगदी विदारक चित्र! दारिद्र्य! दारिद्र्य! यापलिकडे काही चांगले दिसणेही अशक्य होऊन बसले आहे. 'दारिद्र्याला कंटाळून आत्महत्या केली' स्वतःच्या पोटच्या पोरांचे खून केले अशा बातम्या नित्याच्याच होऊन बसल्या आहेत. सुदृढ प्रकृतीच्या तरुण तरुणींना इच्छा असूनही नोकऱ्या मिळेनाशा झाल्या आहेत. याचा परिणाम म्हणून त्यांच्यात असंतोष धुमसतो आहे. याचेच पडसाद नक्षलवाद, गुन्हेगारी, विद्यापीठांत दंगली करणे अशा काहीतरी समाजघातक कृत्यांतून उमटू लागतात.

पोटापाण्याचा प्रश्न सर्वत्रच बिकट झाल्याने ग्रामीण भागाकडून शहरांकडे नोकरी निमित्त येणाऱ्या लोंढ्याचे प्रश्नच दिवसेंदिवस वाढत चालले आहे. पण त्याचा परिणाम शहरांचे प्रश्नही दिवसेंदिवस वाढण्यात व तेथील बेकारीची समस्या अधिक कटकटीची होण्यातच होत आहे.

बेकारी वाढण्याचे परिणाम कलकत्ता आदी बडया शहरांतून दिसणाऱ्या हिंसा-चारात झाले आहेत. बेकार तरुणांची ही राष्ट्रीय शक्ती अशा रितीने वाया जात आहे. सरकार आपल्या परीने ही समस्या सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे हे जरी खरे असले तरी समस्याच इतकी प्रचंड आहे की हे प्रयत्न अपुरे पडू लागतात. सरकारबरोबरच ही समस्या सोडवायला समाज व सामाजिक संस्थांनी हातभार लावला पाहिजे. थोडयाफार प्रमाणात जे काही शक्य होईल ते त्यांनी केले पाहिजे.

याच जाणिवेतून मुंबईतील मराठा मंदिर या सामाजिक संस्थेने त्यांच्या आता-पर्यंतच्या उपक्रमात भर म्हणून व संस्थेच्या रजत महोत्सवाचा एक भाग म्हणून एक नवा व स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. उपक्रमाचे स्वरूप तसे अजून प्राथमिक अवस्थेत असले तरी त्यामागची जाण फार मोठी आहे, मंदिराच्या कार्यकर्त्यांची इच्छा शक्तीही फार प्रबळ आहे.

मराठा मंदिराचा हा 'बेकारी निरोधन संघ' ज्या दुर्दैवी तरुण तरुणींची अन्न-पाण्याची सोय नाही, किंवा जे संपूर्णपणे अथवा अंशतः निराधार आहेत म्हणून त्यांची उपासमार होते, तसेच ज्यांना आधार आहे पण कामधंदा मिळत नाही अशांना सहाय्य करण्याचा प्रयत्न करणार आहे.

अन्नाला पारखे झालेल्या ज्या धडधाकट स्त्री-पुरुषाची कोणतेही काम करण्याची खरीखुरी इच्छा असेल त्यांना मदत करण्याची संघाची तयारी असून संघ ते आपले कर्तव्य समजतो. व अशांनाच प्रथम मदत करायची योजना संघाने हाती घेतली आहे. अशा प्रामाणिक व्यक्तींची नोकरी मिळेपर्यंतची जबाबदारी उचलण्याचा संघाचा मनोदय आहे.

नव्या योजनेनुसार (१) सुदृढ (२) उपासमारीचे भक्ष बनलेले व (३) ठराविक नोकरी मिळाली पाहिजे अशी भूमिका न घेणाऱ्यांनाच त्याचे प्रश्न सोडविण्याकरिता मदत केली जाईल.

याचाच अर्थ असा की ज्यांना लवकरांत लवकर नोकरी मिळणे अत्यंत अगत्याचे आहे. त्यांचाच प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल कारण आता ही फक्त सुरुवात आहे. आणि बेकारीचा प्रश्न फारच प्रचंड आहे. वर म्हणल्याप्रमाणे 'बुभुक्षितानाम् न भयं न विवेकता' तेव्हा बुभुक्षितांचे प्रश्न प्रथम सोडविले जाणें ही सर्वांत प्रथम लक्ष देण्याजोगी गोष्ट आहे. संघ या लोकांना नोकऱ्या मिळवून देण्याचा जो प्रयत्न करणार आहे. त्याबाबतचे संघाचे धोरणही अत्यंत योग्य असेच आहे. अशा व्यक्तीला जी नोकरी दिली ती कदाचित त्या व्यक्तीच्या शैक्षणिक पात्रतेचा विचार करता अपेक्षेसारखी असेलच असे नाही, ती कदाचित त्या पात्रतेपेक्षा कमी पातळीवरचीही असेल पण तशी नोकरी स्वीकारण्याची त्या व्यक्तीची तयारी असणे आवश्यक राहील. कारण आपला समाज 'श्रमनिष्ठ' होण्याऐवजी 'श्रमशिष्ठ' होऊ लागला आहे. अनेक परकीय देशात अमुक एक प्रकारची नोकरी ही कमी पात्रतेची नोकरी समजली जातच नाही. आपल्यासारखी 'श्रमशिष्ठ'तेची भावनाच तेथे नाही. तेव्हा आपल्या समाजानेही बदलत्या काळाप्रमाणे बदलले पाहिजे आणि 'श्रमनिष्ठा' महत्वाची मानली पाहिजे. याच हेतूने संघाने अशी भूमिका घेतली आहे आणि ती निश्चितच योग्य आहे.

म्हणूनच प्रथम संघ, तेथे नावे नोंदविणाऱ्यांची एक यादी तयार करील. त्यानंतर ती व्यक्ती संघाच्या सर्व कसोट्यांत बसते का याचा शोध घेतला जाईल

आणि त्या दृष्टीने योग्य ठरणाऱ्यांची दुसरी यादी तयार केली जाईल आणि त्यांना संघ मग सर्वतोपरी सहाय्य देण्याचा प्रयत्न करील.

बेकारी निरोधन संघ अशा व्यक्तीची नोकरी मिळेपर्यंत जेवणाची सोय तर करीलच पण हातखर्चासाठी (जाण्या-येण्याचे बस व आगगाडीचे भाडे म्हणून) साधारणपणे दिवसाला १ रुपया दिला जाईल. अर्थातच हा काळ जास्तीत जास्त दोन महिने असेल. कारण तेवढ्या काळात त्या व्यक्तीला कोठे ना कोठे काही तरी कामधंदा उपलब्ध करून देण्याची संघ व्यवस्था करील.

वरील काळात म्हणजे त्या व्यक्तीला नोकरी मिळेपर्यंतच्या काळात रोजचे ८ तास संघाच्या कामासाठी द्यावे लागतील. म्हणजे त्या काळात पडेल ते काम करण्याची त्या व्यक्तीची तयारी असली पाहिजे व ती आहे की नाही याकडे संघ याच काळात बारकाईने लक्ष देऊन चाचपणी करील. शिवाय नोकरी मिळण्यापूर्वी नोकरीधंद्यांत व आयुष्यात उपयोगी पडतील असे काही संस्कारही त्या व्यक्तींवर केले जातील. येथेच श्रमनिष्ठा त्या व्यक्तीच्या ठायी बाणविण्याचा कसोशीने प्रयत्न केला जाईल. यासाठी व्याख्याने आयोजित केली जातील.

अशा लोकांना नोकरी मिळवून देण्यासाठी व्यवसायिक व उद्योगपतींचे सहाय्य हवेच. संघाने अनेकांना यासंबंधी मदत करण्याचे आवाहन केले असून त्यांच्याकडून आतापर्यंत चांगला प्रतिसाद मिळाला आहे कारण त्यानाही चांगले संस्कार असलेली श्रमनिष्ठा दाखविणारी आणि योग्य ते शिक्षण असलेली माणसे हवीच असतात. त्यामुळे नोकरी मिळवून देण्याच्या प्रश्न संघाच्या दृष्टीने खूपसा बिकट होईल अशी शक्यता कमी आहे.

अशा प्रकारच्या गरजूंना जेवणखाणं व खर्चाला पैसे देणे हेही प्रचंड काम आहे. त्यासाठी मोठमोठ्या रकमांची आवश्यकता आहे. पण याबाबतीतही अनेक उदार देणगीदार पुढे आल्याने प्रश्न पूर्वी वाटत होता तितका बिकट राहिलेला नाही.

शिवाय ज्या व्यक्तीला संघ काम मिळवून देण्याबाबत मदत करील त्याने त्याला योग्य नोकरी मिळताच संघाबाबतची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तीन वर्षांपर्यंत त्याच्या मासिक उत्पन्नाचा २० वा हिस्सा (जो कमीत कमी फक्त पाच रुपये आहे) द्यावा अशी संघाची अपेक्षा आहे. या पैशाचा विनियोग अशाच इतर गरजूंसाठी करण्यात येईल. त्याचप्रमाणे नोकरी मिळाल्यावर त्या व्यक्तीने सुमारे दोन वर्षांपर्यंत त्याच्या रजेच्या दिवशीचे सुमारे चार तास संघाच्या कामासाठी द्यायचे आहेत. त्यामुळे संघाच्या मागे आस्थापूर्वक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे बळ ही च काम पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने रहावे हा या मागचा उद्देश आहे. म्हणजे यातूनच हेच काम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यासाठी संघटना उभारणे आणि खर्चाला लागणारी रक्कम उभारण्याबाबत जास्तीत जास्त स्वयंपूर्ण होणे असा संघाचा यात प्रयत्न आहे.

वरील प्रकारच्या व्यक्तींबरोबरच इतर बेकारांनाही नोकरी मिळवून देण्याचा कार्यक्रम हाती घेण्याची संघाची इच्छा आहे. पण सध्यातरी प्राधान्य मात्र या लोकांनाच देण्याचा संघाचा मनोदय आहे.

दुसरे एक महत्त्वाचे कार्य संघ करू इच्छित आहे. ते म्हणजे आपल्या तरुणांना नोकरीच्या चाकोरीतून धंदेशिक्षणाकडे वळविण्याचे. त्याचप्रमाणे घरगुती कामे करणारी पण ज्यांच्यावर चांगले संस्कार घडले आहेत व प्रामाणिकपणा आहे अशी मुले, स्वयंपाकी, कंपाउंडर्स, ड्रायव्हर्स वगैरे व्यवसायांचे शिक्षण गरजू तरुणांना देण्याचेही संघाचे प्रयोजन आहे. मुळात म्हणजे तरुणांत ज़िद्द व निष्ठा बाणविणे हे महत्त्वाचे आहे व संघाचे त्या दृष्टीनेही प्रयत्न चालू रहातील.

मराठा मंदिरचे कार्यकारी उपाध्यक्ष श्री. जी. जी. गावडे, अॅड. व्ही. डी. मेंगडे (संघाचे अध्यक्ष) व त्यांचे इतर सहकारी मोठ्या जिद्दीने या कामाला लागले आहेत.

लोकांना संघाची माहिती होण्याकरिता (प्रथम तरी हे काम छोट्या प्रमाणात करायचे असल्याने) ज्या दिवशी किरकोळ कामगार भरतीसाठी शहरातील कारखाने कामगारांना बोलावितात अशा दिवशी एक दोन कारखान्यांच्या दारात उभ्या असलेल्या इच्छुकांना माहितीपत्रके दिली जातील व त्यांच्यातून योग्य त्या व्यक्तींची निवड वरील नियोजित उपक्रमासाठी केली जाईल.

उपासमारीचे भक्ष होणाऱ्या, त्यामुळे निराश होऊन समाजघातक प्रवृत्तींकडे ओढल्या जाणाऱ्यांना योग्य मार्गावर आणण्याचे स्वप्न बाळगून जिद्दीने पण गाजावाजा न करता कामाला सुरुवात करणाऱ्या मराठा मंदिरच्या या 'बेकारी निरोधन संघा'स हार्दिक शुभेच्छा.

□ □ □

---

## बेकारी निरोधन संघ

आपण धडधाकट आहात का?

आपल्यापुढे उपासमारीचा यक्ष प्रश्न उभा आहे का?

आपण मिळेल ते व पडेल ते काम करून, स्वतःच्या घामाच्या पैशाने मानाचे जीवन जगणार का?

आपले जीवन सुस्थितीत येईपर्यंत साम्यवाद, पुंजीवाद, इत्यादि वादंग बाजूला सारून, आपण वास्तववाद स्वीकारणार का?

असे असेल तर 'मराठा मंदिर बेकारी निरोधन संघ', मुंबई नं. ८ चा संपर्क साधा.

---

मुक्काम : औरंगाबाद

भास्कर दोडे

# साकम मेळावा

## एक साहित्यिक धडपड

निजाम राजवटीतून हळूहळू डोके वर काढणारा मराठवाडा आणि त्यातील ही साहित्यिक तरुण पिढीची एक चळवळ—धडपड ! 'साकम' म्हणजे 'साहित्यिक कला मंडळ'! गेल्या तीन वर्षापासून मराठवाड्यात व विशेषतः औरंगाबाद शहरात ही संस्था काम करते आहे. संस्थेच्यावतीने तीस मे एकोणीसशे एकाहत्तरला नवोदित साहित्यिक एकत्र जमले. मेळावा भरला. परस्परांचा जवळून परिचय, साहित्यचर्चा आणि सदस्यांच्या प्रकाशित-अप्रकाशित वाङ्मयावर टीका-टिप्पणी हे तीन उद्देश या मेळाव्यामागे होते !

सकाळपासून सायंकाळपर्यंत दिवसभर कार्यक्रम होता. परिसंवाद, कथाकथन, ग्रंथप्रकाशन आणि कवीसंमेलनही ! सदस्य आणि इतर रसिक बहुसंख्येने हजर होते. कोणत्याही साहित्यिक गटाशी साकमचा सुतराम संबंध नाही, हे एक वैशिष्ठ्यच ! अ-मराठी साहित्यिकाच्या उत्कृष्ट कलाकृतीशी ओळख हा 'साहित्य-भारती' नावाचा अभिनव कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे यंदाही मेळाव्याच्या प्रसंगी घेण्यात आला.

'साकम' मध्ये सर्व थरातले तरुण-तरुणी आहेत ! साहित्याच्या प्रवाहात डोळस-पणे स्वतःला झोकून देणे हा या मंडळीचा स्वभावविशेष ! सहकारी तत्त्वावर प्रकाशनासाठी धडपड हे यांचे लक्ष्य आहे !

तृतीय वार्षिक मेळाव्याचे उद्घाटक होते मराठवाड्यातले, मध्यावर्ति निवडणुकीत विजयी झालेले कॉंग्रेस खासदार श्री. बाबूरावजी काळे ! प्रा. गजमल माळी अध्यक्ष !

परिसंवादाचा विषय होता, "मला जाणवलेले आमच्या मराठी साहित्याचे स्वरूप!" प्रा. काकबेनी संयोजन केले व्यवस्थित. सर्वश्री सुखराम हिवराळे, नरेंद्र मारवाडे, नागनाथ कोत्रापल्ले, रमेश दीक्षित, नरेश इंगळे, बंकट पाटील इत्यादींनी साहित्याबद्दल स्वतंत्र आणि वेगवेगळ्या मुद्यांवर खूप स्पष्ट, सडेतोड व चांगले भरीव विचार मांडले. 'गेल्या दहा वर्षांच्या काळातील वाङ्मय' म्हणजे आजचे वाङ्मय हे सूत्र ठेऊन परिसंवाद रंगला. १९६० नंतरच्या कथा, कादंबरी, काव्य नाटक, समीक्षा आदि वाङ्मयशाखांतील बदल कसा, किती व का घडला याचे दिग्दर्शन करण्यात आले. विषय, भाषाशैली, अभिव्यक्ति आणि इतर आवश्यक मूल्यमापन कसोटयांच्या आधारे वाङ्मयप्रकारांचे परीक्षण केले गेले.

आत्मसंशोधन करण्यास वाचकाला प्रवृत्त करण्याचे सामर्थ्य दिवसेंदिवस वाङ्मयातून नष्ट होत आहे ही एक प्रकारची वाङ्मयाची अधोगतीच समजली पाहिजे. चिंतनशील होऊन आत्मपरीक्षण करावयास लावणारे साहित्य हेच 'अक्षरवाङ्मय', परंतु असे वाङ्मय निर्माण करावयास लावणारे जन्मजात अलौकिक साहित्यिक गुण अंगी असावे लागतात. ते आज दृष्टीस पडत नाहीत. आजची पद्धत ही 'धक्का पद्धती' आहे. काहीतरी उगाचच वेगळेपणा आणून वाचकाला क्षण-दोन क्षण धक्का देण्यात लेखक स्वतःला धन्य मानतात. हीही एक क्षुद्र प्रवृत्तीच! आजचा साहित्यिक साथीचा रोग!

टीका वाङ्मयाचे तर फारच हाल! टीकाकारांची परंपराच खंडित झालेली दिसते आहे. श्री. के. क्षी. वालकु, ग्रामोपाध्ये, बेडेकर, ह्यांची ध्वजा घेणारा मोर्चा उपलब्ध नाही!

तरुण साहित्यिकांना वाव आणि प्रसिद्धी मिळत नाही. अशी रास्त तक्रारही वक्त्यांपैकी काहींनी केली. कंपूशाही आणि गटबाजी नव्यांना दडपून टाकत आहे.

मराठवाड्यातील साहित्यिक प्रगतीचा आढावा घेतला तर असे दिसेल की लेखिका म्हणून तर एकही स्त्री प्रसिद्धीस येऊ शकलेली नाही. लेखक मात्र भरपूर परंतु संधी कुठे? हे लेखक प्रयत्नपूर्वक ग्रामीण जीवनाचे चित्रण समर्थपणे रेखाटत आहेत, याबद्दल अभिमान वाटतो असे एकाने म्हटले, तर दिवसेंदिवस घटनाप्रधान कथेला कमी महत्व येत असून, साहित्यात व्यक्तीच्या भावनात्मक जीवनाचे चित्रणावर भर देण्यात येत आहे, हेही एक आकर्षण असल्याचे म्हटले.

परिसंवादानंतर 'कथा' कथनाचा कार्यक्रम झाला. आणि नरेंद्र मारवाडे यांच्या 'वीण' या कथासंग्रहाचे प्रकाशन झाले! तत्समयी कथांची 'जन्मकथा' त्यांनी सांगितल्याने लेखकाच्या मनातील आंदोलनाचे–'मूड'चे दर्शन सर्वांना घडले.

कविता वाचन (–आणि गायनही–) चांगले रंगले!

एकूण 'साकम'चा तृतीय वार्षिक मेळावा एक दिवस 'मझा' देऊन गेला!

◻ ◻ ◻

# कविता

## खंत

किती किती रात्री आल्या
स्वरा स्वरांत भिजल्या
परि झालो ना तन्मय
नाही सांपडली लय

निळ्या रात्रींच्या नयनी
मदिरा ही धुंदावली
मला नाही झाला स्पर्श
मला बेहोशी ना आली

माझ्या विसावता मिठी
कधी अवखळ यौवन
शहारले नाही गात्र
गेलो नाही वेडावून

आता उतरली उन्हे
जीवनाच्या सायंतनी
चुकचुकते हे मन
जाणीव ही जीवघेणी–

'कसा नाही वेडावलो
यौवनाच्या विभ्रमात ?
कसा नाही धुंदावलो
निळ्या रात्री मदिरेत ?

कशी नाही ऐकू आली
एक आर्त धुंद तान ?
आता शिणलेल्या गात्री
विरे धुक्यातले स्वप्न !

—न. को. वेल्हेकर

## पोर्ट्रेट

आर्ट गॅलरीच्या पायऱ्यांवरून
उधळत गेली मंदस्मित
गुलाबी–गुलाबी
तिचेच पोर्ट्रेट आत आहे
सौंदर्याच्या कलाबुतीत कोरलेलं उन्मादक
यौवन !

जणू त्या चित्रानं धरून ठेवलंय तिला
अधाशीपणानं...
आपल्याच चौकटीत...!
मी मात्र नुसताच पहात राहिलो
असहायपणे
आर्ट गॅलरीच्या पायऱ्यांवरून...!

—न. को. वेल्हेकर

## का रे विचारात धुंद ?

'कारे विचारात धुंद ?'
तू गे मजशी छेडावे
'काही नाही ! कुठे काय ?'
मी का गोंधळून जावे ?

कसे...कधी...कुठे सांगू
तुला मनीचे गुपीत
कसे जळते अंतर
कसे विरती संकेत

कधी वाटते की रोज–
रोज असावी पुनव
धुंद असावे चांदणे
मंद वहावा समीर
तुझी लोभस संगत
–आणि गुंफलेले हात
पहाटेला यावी जाग
किनाऱ्याच्या संगतीत

कधी अचानक यावी
पावसाची मोठी सर
चिंब भिजावे दोघांनी
लाजून तू व्हावे चूर

कधी वेडे उभे माड
तुझ्या–माझ्या वाटेवर
आणि खट्याळ वाऱ्याने
तुझा उडावा पदर

किती रात्र झाली याचे
भान रात्रीला नसावे
वाट पाहून पाहून
वेड्या वाटेने थकावे

कधी तू-मी विसरावे
उरलेले सारे जग
–आणि थांबवावी सारी
श्वासांची ही तगमग...

'कारे विचारात...
...गोंधळून जावे ?'

–न. को. बल्हेकर

## आस्वाद

'पोर्ट्रेट' या कवितेत एक ठसठशीत क्षणचित्र मांडण्याचा प्रयत्न न. को. बेल्हेकर यांनी केलेला आहे. आर्ट गॅलरीच्या पायऱ्यांवरून गुलाबी मंदस्मित उधळीत जाणारी 'ती' आणि आतले उन्मादक यौवनाचे पोर्टेट हे दोन्ही एकच सौंदर्याचे परिमाण व्यक्त करतात. त्या चित्राच्या चौकटीत जणू तिला अघाशीपणाने धरून

ठेवल्याचे जाणवते. हा धरून ठेवण्याचा अघाशीपणा मनातलाच असतो. चित्रावर तो मत्सराने प्रक्षेपित होतो. आपण नुसतेच पायऱ्यांवर उभे असल्याची असहाय्य जाणीव शेवटी होते. पायऱ्यांवरून गुलाबी स्मिताच्या उधळणीतून व्यक्त होणारी गतिमानता, चित्रात निग्रहाने स्थानबद्ध केलेली सौंदर्यगती आणि शेवटी पायऱ्यांवर उरलेली रिकामी पोकळ स्थितिशीलता अशी या अनुभवाच्या गतीची रेखा आहे. खळबळाट, उत्फुल्लता आणि रिकामे निनाद ही त्यातली ध्वनिचित्रे आहेत.

'खंत' या कवितेतली मन:स्थिती थोडी निराळी आहे. आयुष्यात कितीतरी रात्री स्वरांनी भिजून सामोऱ्या आल्या. पण लय सापडली नाही. मदिरेच्या बेहोषीचा कधी आजपर्यंत स्पर्श झाला नाही. यौवनाच्या मिठीने गात्रे शहारली नाहीत. आता जीवनाच्या सरत्या वाटेवर मनाला रुखरुख लागून राहिलेली आहे. ही सगळी भावावस्था मोठी उत्कट आहे. पण तिचे चित्रण मात्र तितके उत्कट झालेले नाही. रात्रीच्या नयनी मदिरा धुंदावणे, जीवनाच्या सायंतनी उन्हे उतरणे या प्रतिमा केवळ पारंपरिक गिरवलेल्या आहेत. शेवटचे कडवे हे पहिल्या कडव्याचे केवळ विरोधी आवर्तन आहे. 'आता शिणलेल्या गात्री। विरे धुक्यातले स्वप्न! या शेवटच्या ओळी पुन्हा कवितेला एक पृथगात्म तरलता प्राप्त करून देतात.

एक हळवी प्रणयावस्था 'का रे विचारात धुंद' या कवितेत मोठ्या भावरम्य-रीतीने न. को. बेल्हेकर यांनी रेखाटलेली आहे. एकमेकांच्या मनातल्या प्रीतीची चाहूल लागलेली आहे पण प्रेमाचे स्पष्ट निवेदन केले गेलेले नाही. आपल्या मनातल्या प्रणयी स्वनांच्या पूर्ततेची ओढ लागलेली आहे, पण ते सांगण्याचे स्पष्ट धाडस अंगी अजून आलेले नाही. साध्यासुध्या संभाषणातही मनाचा गोंधळ होतो आहे, आणि तो गोंधळच मोठा मधुर वाटतो आहे. या साऱ्या भावमधुर अवस्थेचे चित्रण या कवितेत आले आहे. 'जळते अंतर' ही कल्पना पारंपरिक असली तरी 'विरती संकेत' या प्रत्ययात नावीन्य आहे. कल्पनेतली स्वप्नचित्रे अतिशय स्वप्नाळू शब्दात रेखाटली आहेत. त्यात पुनवेच्या चांदण्यात मंद समीरामध्ये किनाऱ्यावर अनुभवलेला एकांत आहे, पावसाच्या मोठ्या सरीत चिंब भिजून पाहिलेले लज्जारूप आहे, खट्याळ वाऱ्याने उडविलेला पदरही आहे. तरुण आतुर प्रेमी मनाचे हे चित्रण मोठे वेधक झाले आहे!

—रसिक



# एरा तो सैतान नोय !

हुजूर, मैंने झंडा फहराया !
शाब्बास बेटे ! अब संभालके नीचे उतरना...

सदानंद नाईक

डुंगपूर काल मध्यरात्रीपासून सैतानांच्या ताब्यात होतं. बंदुकांचे व मशीनगन्सचे आवाज काळोखालाही घाबरवीत होते. मध्येच किंकाळ्या उठत होत्या. कुठेतरी रडण्याभेकण्याचे आवाज येत होते. उस्मान मोहल्ल्यातील धीरजवाला. कोणाच्याही मदतीला केव्हाही धावणारा—आज नव्वद वर्षांच्या म्हाताऱ्यासारखा गलितगात्र होऊन अल्लाची प्रार्थना करीत होता. त्याची बीबी झोपलेल्या अन्वरला पुन्हा पुन्हा कुरवाळीत होती. विचारीत होती—'बेटा, काय होणार आपलं ?' कण्हत होती.

मुर्गे आज मध्यरात्रीपासूनच बांग देऊ लागले. आवाजांना घाबरून काळोख पळाला असावा. मोहल्ल्यातील म्हातारे-कोतारे, आया-बहिणी गोळा झाली तेव्हा उस्मान जेमतेम म्हणाला—'चलो आमरा कोलकता जाबो.' नेहमी दरडावून सांगणाऱ्या उस्मानच्या तोंडून निघालेला रडवा स्वर ऐकून सगळ्यांचे धैर्य आणखी खचले. आपली भिटेबाडी—वतनवाडी—सोडून जायला लागणार म्हणून हवालदील झाले. कुणालाच काही बोलायला सुचेना. काहीतरी ठरवायला तर हवं होतं—

सादतचा बारा वर्षाचा मुलगा करीम एकदम पुढे येऊन म्हणाला—हो हो जायलाच हवं—लवकर—'उस्मानचाचा, हमको ताडाताडी जेते हॉबे.'

थोडीशी चाळवाचाळव झाली. थोडासा धीर आला. काय करायचं ते सैतान यायच्या आत करायला हवं होते. उस्मानने करीमची पाठ हलकेच थोपटली. 'अब तूई आमार लिडर.' चलो...

भेदरलेल्या कोकरांच्या कळपासारखा घोळका पुढे सरकत होता. कुणाला 'दादा' कुणाला 'चाचा' म्हणत करीम कळपाला शक्य तितक्या गतीने पुढे नेत होता. एखाद्या अम्माच्या कडेवरच्या रडणाऱ्या तान्हुल्याला चुचकारीत होता. करीम होताच तसा मोहल्ल्याचा लाडका—आता कलकत्ता लवकर गाठणं आवश्यक होतं...

—खचकन् ब्रेक लावल्याच्या आवाजाने सर्वांनी वळून पाहिलं—करीमसकट सर्वांचेच धैर्य गळून पडलं. समोर हिरवी गाडी होती. त्यातून सैतानांनी पटापट उड्या टाकल्या. दस्त्यांचे व बुटांचे आवाज झाले. क्षणात सैतानांनी घोळक्याला वेढलं.

कॅप्टन ओरडला—' कहा जा रहे हो ? हम तो तुम्हारी हिफाजत के लिये आये है. अपना वतन छोडके जाना अच्छा नही ।'

करीमने घोळक्याकडे पाहिलं. तो आज लीडर होता. ' हा चाचाजी. हम नही जायेंगे वतन छोडके.'

'शाब्बास, देखो कितना हुशार है लडका, चलो हमारे साथ—' कॅप्टन म्हणाला.

संगीनी लावलेल्या, रोखलेल्या बंदुकांचे कडे सभोवती घेऊन घोळका कण्हत कण्हत पुढे सरकू लागला.

' ठहरो !'

बटन दावल्यागत सगळी हालचाल थांबली.

' बेटा, क्या नाम है तुम्हारा ?'

' नाम तो करीम लेकिन मोहल्लेवाले पप्पू कहते है.' पोरगं धीटाईनं उत्तर देत होतं.

' स्कूल जाते हो ?'

' हा, हा, जातो ना, त्या समोरच्याच शाळेत जातो मी.'

—शाळा आज बंद होती—सगळीकडे अगदी सामसूम—

कॅप्टनने हवालदाराकडे पाहून डोळे मिचकावले. ' अब हम तुम्हे सबसे बडी स्कूलमे भरती करेंगे ! जाओगे न ?'

करीमचे डोळे लकाकले.

' चलो, पहले हम तुम्हारा यह स्कूल देखेंगे.'

—शाळेच्या समोर एक गुळगुळीत उंचच उंच ध्वजस्तंभ होता. स्वातंत्र्यदिनी स्तंभावर हिरवा चांदतारा फडकविला जाई. मुलांना खाऊ वाटला जाई.

घोळक्याकडे पाहून कॅप्टन म्हणाला, ' या स्तंभावर पाकिस्तानचा ध्वज किती सुंदर दिसत असेल नाही. पण तो आज कसा लावायचा—आज काही स्वातंत्र्यदिन नाही—आज यौमे आजादी नही है—शिवाय तुमच्या भावनाही आम्हाला कळतात—पण नोकरीपुढे काय करणार ? आम्हा मिलिटरीवाल्यांना शिस्त पहिली मग बाकीचे सगळे. पहले हुक्म की पाबन्दी.'

घोळक्याला हायसं वाटलं. डोळे पाणावले—घोळका पुटपुटला—' हे सैतान नाहीत तर—खुदा यांना सलामत ठेवो.'

' इस्लाम के लिए यह काला दिन है.' कॅप्टनने सुभेदाराकडे पहात म्हटलं, ' चला आपण या स्तंभावर काळा झेंडा लावू या.'

—सुभेदार हसला.

'क्यो करीम–नही नही पप्पू–चढोगे इस खंबे पर ?'

करीमने घोळक्याकडे पाहिलं.

घोळका उंचच उंच गुळगुळीत ध्वजस्तंभाकडे पहात होता.

'तेरे जैसे बहादूर लडकेके लियें यह कुछ भी नही–चल ले, यह काला कपडा.'

करीमच्या दिशेने चार-पाच संगिनी पुढे सरकल्या.

उसने हास्य चेहऱ्यावर आणून 'लीडर' म्हणाला, 'हा क्यू नही !'

करीम स्तंभावर चढू लागला...

म्हातारे अल्लाला शोधत होते. बाया डोळ्याला पदर लावत होत्या.

'चढो चढो' सैतान प्रोत्साहन देत होते.

करीम पाच-सहा फूट वर गेला–खाली घसरला–वर जाण्यापेक्षा खाली येण्याचा वेग जास्त होता–जीवाचा आकांत करून पप्पू धडपडत होता–वर जात होता–खाली येत होता–

'शाब्बास' सैतान ओरडले.

करीमने स्तंभावर काळे फडके फडकवले होते.

चेहरा घामाने निथळलेला, चेहऱ्यावर असहाय फिक्कट स्मित. दमलेला करीम अभिमानाने कमजोर आवाजात म्हणाला–'हुजूर, मैंने झंडा फहराया.'

'शाब्बास बेटे' कॅप्टन म्हणाला, 'अब संभलके नीचे उतरना.'

–आता खाली उतरण्याची केविलवाणी धडपड–हात सुटला–पाय घसरला तर–आधीच दमछाक झालेली–

–घोळका डोळ्यांत प्राण आणून बघत होता–

'क्यो करीम, अरे डरते हो क्या ?' एक हवालदार म्हणाला.

'अरे, डरो नही. हम मदद करेंगे.' दुसरा म्हणाला.

उस्मान अवाक्–एक प्रेत उभं होतं–

'अरे, ठहरो ठहरो' कॅप्टन पुढे सरसावला. 'मीच त्याला मदत करतो, दमला वाटतं बिचारा–ठहरो करीम, मै तुम्हे नीचे उतारता हूँ !'

घोळक्याचा टांगणीला लावलेला जीव जरासा सुखावला. अखेर हे सैतान नाहीत. घोळका पुटपुटला–'एरा तो सैतान नोय् !'

अलगद ये हं खाली. पुढे सरकून कॅप्टनने बंदुकीचा चाप ओढला.

सैतानांचा जल्लोष आणि घोळक्याचे दबल्या आवाजातले चीत्कार एकमेकांत मिसळले.

करीम कोसळून जमिनीवर निपचित पडला होता–सैतान खिदळले आणि त्यांनी कळप पुढे हाकलला.

□ □ □

महावीर जोंधळे

माझ्या बापाच्या
गालफडात माझ्या
सासूची चप्पल....
काय....जमणार नाय....

# कोल्हापुरी चप्पल

गावकाठचं काळभोर रान अस्ता-व्यस्त पसरलेलं...बांधावर काटक्या उभ्या कराव्यात तशा उंच उंच काही खुज्या बाभळी अन् तापलेल्या उन्हानं माणूस करपून जावू नये म्हणून ह्या बाभळीत एक वारवसा...टुमदार आंब्याचं झाड... झाडावर भगवी पताका काटकीसह फडफडत होती.. माणसाची चाहूल लागल्यावर गावकोसाला बसलेल्या बाया पटापट उठाव्यात तशा मोहळावर बसलेल्या माशा कुणाच्या तरी चाहुलीनं उठल्या...ती होती बैलाला दिलेली शिवी...

...या काळ्या रानात नांगर चालेला होता. अन् मध्येच बसायची सवय असलेला बैल बसला की तोंडातनं भाडकन् शिवी यायचीच... त्यानं शिवी हासडली अन् चाबकाचा आवाज आला तशी पाखरं चिवचिवत उठली.काळरान भडभडलं....

बांधावरच्या झुडपाजवळून नांगर वळविला की बांधावरल्या कोपटातून चिवचिवीचा आवाज आला. अधून मधून चप् असा आवाज आला...पुन्हा किलकिलाट ...पुन्हा लांबलचक शिव्याची लाखोली. महाद्यानं नांगर उभा केला अन् धावतच तो बांधावरल्या खोपटात आला त्यानं पाहिलं... सालं...आपली बायको सग्या मायीला मारतेया,...केस धरू धरू...'च्या मायभणं ! ऽऽ' म्हणत महाद्या तसाच आत गेला अन्



बायकोला एका लाथेत निजवित म्हणाला.

" तुझ्याभणं अशी का ग घातली. " असं म्हणत म्हणतच चावकानं सालीला झोडलं. शेपटी पिरगाळून बैलाला मारावं तसं केस धरून उचलावं आपटावं... मारावं.. उचलावं...मारावं...

" कागं रान्ड. माझ्या माईला मारलीस, "

" मपल्याली मायभनीवर शिव्या दिल्या. "

" चपलीनं नाही का मारलं. "

पुन्हा आडवी केली. अन् उभी सडकीली. दाताच्या भगळीतून लाल पाणी यायला लागलं...ती तशीच निपचित पडून राहिली. महाद्या माईजवळ गेला. पाटीवर उमटलेले काळेवण पाहून त्याच्या डोळ्यात पाणी उभे राहिलं. डोळे पुसले. सनकातली तेलाची शिशी काढली अन् आईच्या पाठीच्या मारावर तेल लावलं...अन् पुन्हा तेलाची शिशी फेकली...

" रान्डीची ! आवर. आली तसी घाल माहेराला. गळ्यात फुटकामनी न्यायचा नाही इथला, असे म्हणत उठला अन् तिला सरपटत सरपटत कोपटाबाहेर काढलं अन् ओरडला. "

" मायघेणी, तुझ्यामुळं बैल उणांत करपत्यात. घे तळतळाट. चालती हो. च्यायल्ली ! तालुक्याला जावून राजिनामा दितू तुझा. "

उताणं आ वासून पडलेल्या शिवारात नांगर उभा होता. एक बैल बसलेला अन् एक तसाच उभा...वाऱ्यानं झाडाच्या फांद्या वेडेवाकडचा होतं व्हत्या. झाडंझुडपं डोळं मोडत व्हती. विहिर बोटं मोडत व्हती...महाद्याचा आवाज ऐकून वारा पळून गेलेला व्हता.

" काळ कर आवदासा. नाहीतर चिद्या करीन अन् टाकीन पुरून. च्यायल्ली ! रान्ड."

दातातनं वाहाणारं लाल पाणी पुसीत पुसीत ती तिरकस फुटलेल्या लागली रस्त्याला...अन् थोडयाच वेळात दिसेनाशी झाली. अन् मग महाद्या उठला तो आईला काही तरी सांगत.

" माय ! रान्डीचा बदला घेईन तवाच ह्यो महाद्या शांत बसन, " तो नांगराकडं धावला.

बराच वेळ थांबलेल्या बैलाला उठवून नांगर सुरू केला. बायकोचा सारा राग बैलावर निघू लागला. दिवस हळूहळू पावलं टाकीत घरटयाकडे चालू लागला होता. थोडयाच वेळात दिवसानं काळं केलं अन् नांगर सोडला. बैलाला वैरण टाकून खोपटात आला. आईच्या अंगावरचे वण पाहून दातओठ खातच बाज टाकली. त्यावर आडवा झाला. धोतराचा सोगा तोंडावर घेतला. पण रात्रभर झोप नाही आली. तशीच रात्र पार पाडली. तालुक्याला जाण्याच्या विचार करीत करीत तोंड धुतलं...चहा घेतला अन् पुन्हा बाजेवर येऊन बसला...पुन्हा कोपटात गेला. शेमला बांधून जोडा पायात सरकीवला अन् खाकरतच बाहेर आला. पाहतो तर त्याची कारभारीण सुजलेलं तोंड घेऊन बापा सकट हजर...

...सासऱ्याला पहाताच महाद्या चिडला.

" का येणं केलं."

" कारभारणीला सोडवाया."

" मायची सटवी. हलकट लेकाची. माजं तिजं नाय जमायचं, तुम्ही आपलं पगा. मी राजीनामा देणार हाय तिजा,...

" पर का ?"

" रान्डीचीनं. माझ्या माईली वाहाणानं बडविलं. तिला काय माय बहिणी नाहिती. मी नांदविणार नाही तिला, घेऊन जावा तुमी."

" समा मागतो मी तिच्यावरची." महाद्याचा सासरा काकुळतीला आला तसा महाद्याला चेव आला.

" मामा ! ती काय चालणार नाय. आताच्या आता तिला घेऊन जावा."

" तुमीबी मारलं ना तिला. मग झालं."

" च्यायल्ला ! बदला, त्यो बदला नाही - बदला...बदला घ्यायचाय

" घ्या बाबा घ्या ! मी लेकीचा बाप. सहन करीन."

" मायो, हिकडं ये जरा. "

" आले ऽऽऽ"

महाद्याची आई बाहेर येताच महाद्या ओरडला, " दाखव इवायाली खुणा. महाद्याच्या आईनं हातापायवरचे वण दाखविले. तसा सासरा दचकला अन् त्यानं स्वतःच्या लेकीला शिवी हासडली.

" ए सटवे ! कशापाई हे. नांदायचं नाही. कुणाची फूस हाय ग ही...काळं तोंड घेऊन गावात मिरवायचंय् व्हय. "

" नाय. "

" मग. "

" जावई बापू. मी पाया पडतो आई साहेबाच्या. "

" एवढयावर जमायचं नाय. "

" जमून घ्या. इव्हढीबार. "

" जमून घेईन पर एक अट हाय, "

" कणंची. "

" मी लगीन करणार हाय दुसरं. त्यावर आंगठा पायजी हिचा "

" मागाल ती देतो पर..."

" सोनं अन् पाटीभर गंडे दिले तर जमणार नाय, "

" मी पाया पडतु तुमच्या..."

" नाही जमत, "

महाद्याच्या सासऱ्यानं जावयाचे पाय धरले. प्रकरण हातघाईवर आलं पण छे...आईची समजूत घातली पण छे...महाद्या म्हणजे महाद्या. अर्कट भोसडीचा.

" मग जावा म्हणता वापस. "

" जावाकी मी काय आडव आलो व्हय. "

महाद्याची कारभारीण बऱ्याच वेळानं जागी झाली. ती नवऱ्याची व सासूची विणवणी करू लागली. डोळे सुजेपर्यंत रडली. पर छ्या. शेवटी महाद्यानं एक अट घातली.

" रान्ड ! तुला माझ्या जवळ नांदायचय "

" व्हा, "

" मी तुला नांदविण पर, "

" पर काय..."

" एक अट हाय. परिक्षाच म्हण की. त्यात फास झाली पायजेस, "

" कणची परिक्षा, "

" माझ्या आईच्या पायातली वहान घेऊन माझ्या देखत तुझ्या बापाच्या तोंडात मार. "


शहाळं खाण्याची
ही एक पद्धत
पण ही
त्यापेक्षांही चांगली
भारतातील सर्वोत्कृष्ट नारळांच्या कुरकुरीत स्वादिष्टपणाची मधुर चव तुम्हांला ब्रिटानिया नाईस बिस्किटांत आढळेल. ती उत्तम स्वादाची नि कुरकुरीत असून त्यांवर उत्तम प्रकारची शुभ्र साखर पसरलेली असते. ब्रिटानिया नाईस. वैशिष्ट्यपूर्ण स्वादाची वैशिष्ट्यपूर्ण बिस्किटे.
ब्रिटानिया नाईस बिस्किटे
NICE
NICE
भारतातील सर्वोत्कृष्ट बिस्किटे ब्रिटानिया

महाद्याच्या सासऱ्याचा चेहरा काळा ठिक्कर पडला. जिभेला कोरड पडली. अन् नजर वळचणीकडे लावली,

" बोल. हाय कबूल, "

कारभारणीचे पाय थरथरायला लागले. गळा सुकून गेला. ओठ कापायाला लागले. भडभडून आलं. आभाळं यावं तसे डोळं भरून आले. छाती खालीवर व्हायला लागली. तसा...

" बोल वकूत करू नगस. मला तालुक्याला जायचय. "

आभाळ भरून आलेलं. विजा लवत होत्या. कडाकड् बोलत होत्या. फांदा मन लावून डुलत होत्या. काळरान हासत होतं...झुडपं एकावर एक आदळत होते. हिरीच्या कडेला बसलेले पारवे फडफडायला लागली. व्हला गुरगुरला.

...याच वातावरणांत महाद्याच्या सासऱ्याचा अस्पष्ट आवाज उमटला.

" कबूल म्हण सटवे. चुक तुझी हाय. "

" नाय. माझ्या बापाच्या गालफाडात माझ्या सासूची चपल. जमणार नाय. "

" रान्डीचे गुरमी हाय तर मर., मला तालुक्याला जायचय. मी निघतो. तसा महाद्याचा सासरा पोरीला जवळ घेत म्हणाला.

" पोरी तुझी सासू माझी आई हाय. आईची चप्पल लेकानं खाल्ली तर लई बेहत्तर. मारलीस तर लागायची नाही. मला नाही वाईट वाटायचं. "

तसा महाद्या हासला अन् म्हणाला.

" कारभारणे होय म्हण. बाप तयार हाय.. "

मायं ! काढ पायातल्या वाहना. चांगल्या कोल्हापुरी हायती. पोराचं ऐकून महाद्याच्या मायंनं चपला सुनाम्होरं काढल्या अन् बोळकं झालेल्या तोंडानं म्हणाली.

" हाणमाय बापाच्या गालफाडीत अन् घे पांग फेडून. "

" मला क्षमा करा. मला मारा जीव जाईपर्यंत, "

" नाही तुला नाही. उचल चप्पल...अन् हान माझ्या तोंडात " पोरीचा बाप बोलला.

" अखेर महाद्याच्या बायकुनं थरथरत्या हातानं सासूची वहाण घेतली... "

पाय लटपटत होते. चेहरा भेसूर झाला होता. उचलेलं वहाण बापाच्या गालफाडीत मारली अन् ती खाली कोसळली,

" दादा, ऽऽऽ... "

विज जोरजोराने चमकत होती...कडाकड...कडडकड.

श्री. वि. शं. पारगावकर यांची ' निगूडा ' ही लघु कादंबरी व पहिल्या काही कथा ज्या वेळी प्रसिद्ध झाल्या त्या वेळी, मनाच्या नाजुक लळितांना हळुवार शब्दरूप देण्याच्या या लेखकाच्या ठिकाणी असणाऱ्या कुवतीचा ठसा मनावर उमटला होता. भावकाव्यात्मक कथाकादंबरीच्या पद्धतीचे चांगले लेखन त्यांच्याकडून होईल असा विश्वासही वाटला होता. परंतु मधल्या काही वर्षांत काय झाले माहीत नाही. या लेखकाने आपल्या लेखनसौकर्याचा विनियोग पत्रकारी धर्तीचे लिखाण करण्यासाठी केला. त्याचे परिणाम त्यांच्या ललितलेखनात दिसू लागले. प्रसन्न वाचनीयतेपलीकडे वेगळे काही श्री. पारगावकरांच्या लिखाणात दिसेनासे झाले. त्यामुळे ' अंतरिता 'ही त्यांची नवी कादंबरी हातात घेतली त्या वेळी विशेष काही अपेक्षा मनात बाळगल्या नव्हत्या. मात्र ही कादंबरी वाचायला प्रारंभ केल्यावर जागोजाग जुन्या पारगावकरांची भेट होऊ

सौ. पुष्पा भावे

# पुस्तके

## जुन्या पारगावकरांची आठवण देणारी अंतरिता

लागली आणि ओघानेच जुन्या अपेक्षा पुन्हा जाग्या झाल्या.

' अंतरिता ' या कादंबरीचा तोंडवळा वरवर पाहता श्री. गो. नी. दांडेकरांच्या ' पडघवली 'सारख्या कादंबऱ्यांशी जुळता आहे. छोट्या गावाचा, एकत्र कुटुंबाचा आणि कादंबरीतील मुख्य पात्रांचा संबंध याही कादंबरीमध्ये महत्त्वाचा आहे. पण ही कादंबरी इथेच थांबणारी नाही. आपल्या वाटणीचे सोनेनाणे, जमीन इतर भावांना वाटून टाकणारे तात्या पूर्वसंकेतांशी असलेले नाते तोडून पुढे झेप घेण्याचा प्रयत्न करणारे द्रष्टे आहेत. तात्यांच्या या द्रष्टेपणाचे आकलन होण्याची कुवत कुटुंबात वा गावात निर्माणच न झाल्याने सुरुवातीपासून अखेर-

पर्यंत ते एकाकीच राहतात. त्यांच्यावर निरपेक्ष प्रम करणाऱ्या मथुरेसारख्या व्यक्तित्वसंपन्न स्त्रीच्या सहवासाच्या पार्श्वभूमीवर हे एकाकीपण अधिक विदारक वाटते.

कादंबरीच्या पूर्वार्धातच तात्यांचे वाटणी नाकारणारा देवमाणूस म्हणून व त्याच्या पत्नीचे—मथुरेचे—आपल्या पतीचा संसार फुलावा म्हणून सवत आणणारी साध्वी म्हणून चित्रण केल्यानंतरही या आदर्शांपाशी, श्री. पारगावकरांचे व्यक्तिचित्रण शरण जात नाही. आपल्याला मूल होत नाही म्हणून पतीचे दुसरे लग्न करून देणारी स्त्री मराठी वाचकाला अपरिचित नाही. परंतु अशा लग्नानंतरच्या स्त्री-पुरुष संबंधाचे सूत्र धिटाईने रंगविणारा लेखक मात्र आपल्याला फारसा परिचित नाही. तसेच या कादंबरीचा कथावस्तुफलक इतका विस्तृत आहे की वरील नाट्यपूर्ण संविधानक त्यामधील एक लहानसे चित्र आहे. पुत्रप्राप्ती झाल्यामुळे तात्यांच्या उत्साहाला जो बहर येतो त्याचा ग्रामरचनेशी निकटचा संबंध आहे. नव्या उमेदीने घर बांधणारे, नव्या तंत्राने शेतमळा करणारे नव्या पिढीसाठी गावात अनेक नवे प्रकल्प निर्माण करणारे तात्या आपल्या कुटुंबजीवनातील तृप्ती गावावर उधळीत आहेत, तर मुळातच त्यांच्या औदार्याने कानकोंडे झालेले भाऊबंद त्यांच्या कर्तबगारीने थक्क होऊन त्यांचा द्वेष करू लागले आहेत. त्याची फारशी खंत न बाळगणाऱ्या तात्यांना त्यांच्या ग्रामरचनेच्या कार्यात विघ्न आणणारा साहेबराव नावाचा शत्रू निर्माण झाला आहे. गावात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचे बीज रुजते—तात्यांनी संकल्पिलेल्या आदर्श ग्रामकल्पनेला कीड लागते; आणि इकडे त्यांच्या पुत्राच्या रूपाने त्यांच्या घराच्या मुळाशीच कीड लागली आहे. सावत्र आईने जाच केला असा प्रवाद निर्माण होऊ नये म्हणून मथुरा तात्यांच्या मुलाचे अपराध पोटात घालते त्यामुळे तो हाताबाहेर जातो. जुन्या काळातले असून तात्यांनी जी जिद्द, नव्या युगाच्या आवाहनाची जी जाण दाखवली ती गावातल्या तरुणांना कळत नाही, झेपत नाही. आयुष्यभराच्या खटाटोपाने शिणलेला हा मनस्वी पुरुष या धसक्यानेच देह ठेवतो. पुत्रोत्पत्तीने त्यांचा संसार फुलवणारी कृष्णा आधीच भरल्या कपाळाने गेलेली असते. पण जिचे त्या संसारात तसे काहीच नसते ती मथुरा मात्र, पती अंतरल्याने, त्याच्या कर्तबगारीची परंपरा पुत्र असूनही नष्ट झालेली पाहायला मागे उरते.

## सरळ, साधे परंतु संवेदनाक्षम...

माणसामाणसांमधील नात्यांचा गुंता हळुवारपणे उलगडणारे, व्यक्तीच्या मनातली कासाविशी नेमकी व्यक्त करणारे, सरळ साधे परंतु संवेदनाक्षम निवेदन, हा या कादंबरीचा विशेष आहे. या कादंबरीचे कथानक फार वेगळे आहे किंवा तिच्यातील अनुभवविश्व आगळे आहे असे नाही. परंतु एकत्र कुटुंब, गाव यांच्या संदर्भात

उभी असलेली कर्तबगार व्यक्तीची मराठी कादंबरीतील जी प्रतिमा आहे तिचे परिमाण श्री. पारगावकरांनी प्रस्तुत कादंबरीने निश्चित विस्तारले आहे. अशा आदर्शरूप पुरुषाच्या चित्रीकरणाला त्यांनी मानुष करणाचे गहिरे रंगही दिले आहेत. या कादंबरीत अनेक भडक नाटयप्रसंगापासून त्यांनी निवेदनाला अलिप्तही राखले आहे. एवच, पुन्हा एकदा श्री. पारगावकरांच्या कथात्मक लिखाणातील क्षमतेचा प्रत्यय आला; मधल्या पत्रकारितेने खरे पारगावकर संपूर्ण झाकळलेले नाहीत अशी साक्ष मिळाली. परंतु हेही केवळ आश्वासन ठरू नये अशी श्री. पारगावकरांच्या संवेदनाक्षम निवेदनशैलीच्या चाहत्यांची मनःपूर्वक इच्छा आहे. ▫

**अंतरिता : वि. शं. पारगावकर : इनामदार बंधु प्रकाशन : मूल्य दहा रुपये.**


नाण्याला
तिन बाजू असतात...
दोन नेहमीच्याच आणि तिसरी बाजू परीघ (जाडी)
युनायटेड वेस्टर्न बँकेत रक्कम गुंतविल्याने नाण्याचा परीघ वाढतो म्हणजेच रकमेत वाढ होते. आकर्षक व्याज दराच्या गरजेनरूप विविध ठेव योजना.
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कचेरी: चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा.
स्थापना: १९३६ महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा शेडयुल्ड बँक
वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झीक्युटर कंपनी लि.
बँकेच्या या सलग्न संस्थेमार्फत विश्वस्त निधी व व्यवस्थापनाची कामे केली जातात

# समाजवाद्यांचे एकीकरण

**वा. दा. रानडे**

प्रजासमाजवादी व संयुक्त समाजवादी पक्षांचे एकीकरण होऊन नवा समाजवादी पक्ष अस्तित्वात आला आहे. या दोन पक्षांचे नेत्यांच्या आतापर्यंत अनेकदा वाटाघाटी झाल्या व फिसकटल्या. तेव्हा आताचे हे एकीकरण कितपत टिकेल अशी शंका राजकीय निरीक्षकांच्या मनात आली तर ती स्वाभाविकच म्हणावी लागेल. हे एकीकरण कितपत टिकाऊ ठरेल ? भारतीय राजकारणावर नवा पक्ष कितपत प्रभाव पाडील ? समाजवादी चळवळीचे पाऊल पुढे पडण्यास त्यामुळे कितपत मदत होईल ? या प्रश्नांचा विचार या अनुषंगाने येथे करीत आहे.

एकीकरणाचा विचार करताना प्रथम लक्षात घ्यावयाची गोष्ट म्हणजे काही वर्षांपूर्वी एकच असलेले दोन पक्षच पुन: एकत्र आले आहेत. हे दोन पक्ष विभक्त का झाले ? आणि आता एकत्र का येत आहेत ? पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर आचार्य कृपलानींचा किसान मजदूर प्रजा पक्ष आणि समाजवादी पक्ष (पूर्वीचा काँग्रेस समाजवादी पक्ष) एकत्र येऊन प्रजासमाजवादी पक्ष ऑगस्ट १९५२ मध्ये स्थापन झाला. या पक्षात प्रथमपासूनच दोन प्रवाह होते. एक काँग्रेसशी सहकार्याची क्षेत्रे शोधावी असे प्रतिपादणारा गट आणि दुसरा काँग्रेस व कम्युनिस्ट यांच्यापासून पक्षाने सारख्या अंतरावर राहून स्वतःच्या कार्यक्रमावर पक्ष संघटना उभारावी असे प्रतिपादणारा गट. काँग्रेस आणि प्रजासमाजवादी पक्ष यांच्यात सहकार्याच्या दृष्टीने जयप्रकाश नारायण यांनी फेब्रुवारी १९५३ मध्ये पंडित नेहरूंशी बोलणी केली. पण ती फिसकटली. आचार्य नरेंद्र देव व विशेषत: डॉ. राम मनोहर लोहियांचा अशा सहकार्यास विरोध होता.

यानंतर त्रावणकोर-कोचीनमधील गोळीबाराच्या प्रश्नावरून पक्षात पेचप्रसंग निर्माण झाला. गोळीबाराच्या न्यायालयीन चौकशीचा हुकूम देऊन मुख्यमंत्री पट्टम ठाणू पिले यांनी राजिनामा द्यावा अशी तार सरचिटणीस डॉ. लोहिया यांनी त्यांना पाठविली पण त्यांनी राजिनामा देण्याचे नाकारले. तेव्हा निषेधार्थ लोहियांनी सरचिटणीसपदाचा राजिनामा दिला. पक्षाच्या खास अधिवेशनाने पिले यांना पाठिंबा दिला पण पक्षात या प्रश्नावर तीव्र मतभेद निर्माण झाले. मतदानानंतर अध्यक्ष आचार्य कृपलानी यांनीही राजिनामा दिला.

समाजवादी धर्तीची समाजव्यवस्था स्थापण्याचे उद्दिष्ट १९५५ साली आवडी

येथील अधिवेशनात काँग्रेसने मान्य केले. त्यातून प्रजासमाजवादी पक्षात आणखी मतभेद निर्माण झाले. काँग्रेसशी असहकाराचे धोरण आता कालबाह्य ठरले आहे असे पत्रक मुंबईच्या गटाने काढले. अशोक मेहतांच्या प्रेरणेनेच हे पत्रक निघाले असा आरोप मधु लिमये यांनी केला. आचार्य नरेंद्र देव यांनी त्यांना आरोप मागे घेण्यास सांगितले पण त्यांनी नकार दिला. तेव्हा मुंबई शाखेचे त्यांचे सभासदत्व स्थगित करण्यात आले. पुढे लोहियांचेही सभासदत्व स्थगित करण्यात आले. त्यांनी पक्षातून बाहेर पडून समाजवादी पक्ष स्थापन केला.

## पी. एस. पी. ची भूमिका

मुख्यत: काँग्रेसशी सहकार्याच्या प्रश्नावर हे दोन पक्ष विभक्त झाले होते. काँग्रेस मधील फुटीनंतर बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे अशी धडाडीची पावले इंदिरा गांधींच्या पक्षाने टाकली. तेव्हा त्या पक्षाशी ' अर्थपूर्ण संवाद ' करण्याची भूमिका प्रजासमाजवादी पक्षाने घेतली. " इंदिरा गांधींची काँग्रेस हा डावीकडे झुकलेला पक्ष आहे. देशाला समाजवादाकडे नेण्यासाठी डाव्या पक्षांनी त्याच्याशी सहकार्य करावे ", असे मत प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष ना. ग. गोरे यांनी गेल्या डिसेंबरात व्यक्त केले होते. बेकारी, भाववाढ, भूमिविषयक कायद्यातील सुधारणा आणि कामगारातील असंतोष या चार प्रश्नांवर दोन्ही पक्षांचे धोरण सारखे असून सहकार्य होऊ शकेल असेही मत त्यांनी व्यक्त केले होते. संयुक्त समाजवादी पक्षाशी एकीकरणाच्या वाटाघाटी का फिसकटल्या याची कारणे सांगताना त्यावेळी ते म्हणाले होते : ' इंदिरा गांधींच्या काँग्रेसबाबत ' विरोधासाठी विरोध ' ही संयुक्त समाजवाद्यांची ठाम भूमिका असल्याचे आढळले. प्र. स. प. ला असे वाटते की सत्तारूढ काँग्रेसला जहाल वळण देण्यास वाव असून डाव्या गटांनी हे लौकर घडवून आणण्यासाठी सत्तारूढ काँग्रेसशी सहकार्य केले पाहिजे. '

निवडणुकीत सत्तारूढ काँग्रेस राष्ट्रीय पातळीवर आपल्याशी समझोता करील अशी प्रजासमाजवादी नेत्यांची अपेक्षा होती, पण काँग्रेसने असा समझोता करण्याचे नाकारले. केरळमध्ये बिगर मार्क्सवादी आघाडीच्या सरकारमध्ये प्र. स. पक्ष सत्तारूढ काँग्रेसच्या बरोबरीने सामील झाला होता. निवडणुकीनंतरही पश्चिम बंगाल व बिहारमध्ये सत्तारूढ संयुक्त आघाड्यांत सत्तारूढ काँग्रेस व प्रजासमाजवादी पक्ष एकत्र आलेले आहेत. बिहारच्या नव्या मंत्रिमंडळाचा २ जूनला शपथविधी झाला व त्यानंतर नऊच दिवसांनी म्हणजे ११ जूनला प्र. स. प.–सं. स. प. एकीकरण मसुद्यात प्र. स. प. च्या कार्यकारिणीने मान्यता दिली. ' राष्ट्रवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद यांना विरोधी असलेल्या पक्षांशी संयुक्त आघाडी करण्याचे धोरण नवा पक्ष सोडून देईल ' असे या मसुद्यात म्हटले असून या भूमिकेस विरोधी असलेले पक्ष म्हणून दोन्ही काँग्रेस पक्ष, दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, जनसंघ व स्वतंत्र पक्ष यांचा उल्लेख केला आहे. ' सत्तारूढ काँग्रेस समाजवादाचा दावा करीत असली तरी प्रत्यक्षात जैसे थे स्थिति चालू ठेवणारी धोरणेच अवलंबीत असून

मूलभूत रचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी उपाय योजण्याचे टाळीत आहे.' असे सत्तारूढ काँग्रेसच्या स्वरुपाचे विश्लेषण या मसुद्यात केले आहे.

प्रजासमाजवादी पक्षाने आतापर्यंत जे धोरण अनुसरले त्यावरून सत्तारूढ काँग्रेसच्या स्वरुपाचे हे विश्लेषण त्यांना मान्य नव्हते हे स्पष्ट दिसते. त्यांना हे विश्लेषण मान्य असते तर एकीकरण मसुद्यास मान्यता देण्याच्या नऊ दिवस आधी आपल्या पक्षाने बिहारच्या सत्तारूढ संयुक्त आघाडीत सामील होण्यास प्र. स. प. नेत्यांनी मान्यता दिलीच नसती.

वास्तविक सत्तारूढ काँग्रेसच्या स्वरुपाचे हे विश्लेषण काही नवे नव्हते. काही डाव्या पक्षांनी व नेत्यांनी ते यापूर्वीच केले होते. पण प्रजासमाजवाद्यांनी मात्र ते उशीरा मान्य केले. सत्तारूढ काँग्रेसशी सहकार्याचे धोरण प्रजासमाजवाद्यांनी सोडले तसेच सिंडिकेट काँग्रेस, जनसंघ, स्वतंत्र पक्ष यांच्याशी सहकार्याचे धोरण संयुक्त समाजवाद्यांनी सोडले. या दोन पक्षांच्या धोरणात हा जो मोठा बदल झाला तो मुख्यत: लोकसभा निवडणुकीने दिलेल्या धक्क्यामुळे. या निवडणुकीत संयुक्त समाजवादी पक्षाला तीन तर प्रजासमाजवादी पक्षाला फक्त दोन जागा मिळाल्या. प्रत्येक निवडणुकीनंतर या दोन पक्षांचे अनुयायात एकीकरणाची लाट उसळते. या वेळचा पराभव फारच मोठा असल्याने एकीकरणाला अधिकच चालना मिळून दोन्ही पक्ष अखेर एकत्र आले. ते एकत्र आले म्हणण्यापेक्षा परिस्थितीनेच त्यांना एकत्र येणे भाग पाडले असे म्हणणे अधिक बरोबर होईल.

## प्रभाव कोणाचा ?

एकीकरण मसुद्यात कोणाच्या भूमिकेचा प्रभाव अधिक आहे याची चर्चा दोन्ही पक्षांचे नेते उघडपणे करणार नाहीत. कारण त्यातून पुन्हा वाद निर्माण होतील. पण एकीकरणाचा मूळ मसुदा आणि त्यात संयुक्त समाजवाद्यांच्या सूचनेनुसार केलेले बदल पाहिले म्हणजे त्यावर संयुक्त समाजवाद्यांचा ठसा अधिक आहे असे वाटल्याशिवाय रहात नाही. 'केंद्रात व राज्यात नवा पक्ष लोकशाहीवादी, समाजवादी, जबाबदार विरोधी पक्ष म्हणून काम करील' असे मसुद्यात म्हटले होते त्या ऐवजी 'लढाऊ समाजवादी पक्ष' म्हणून ते काम करील. हा संयुक्त समाजवाद्यांनी सुचविलेला बदल मान्य करण्यात आला. 'जबाबदार, लोकशाहीवादी विरोधी पक्ष' हे शब्दही वास्तविक महत्त्वाचे होते. 'त्यांच्या जोडीला 'लढाऊ' शब्द घालता आला असता. 'लढाऊ' शब्द घालताना हे शब्द काढून टाकण्याची काही आवश्यकता नव्हती. जनसंघाचे वर्णन मूळ मसुद्यात 'एकांगी जातीय शक्ती' असे केले होते. त्याऐवजी 'पुराणमतवादी आर्थिक व सामाजिक धोरणात ज्याची मुळे रुजली आहेत अशी फूटपाडी जातीय शक्ती' असे त्याचे वर्णन दुरुस्त मसुद्यात केले आहे.

संयुक्त समाजवाद्यांच्या 'अंग्रेजी हटाओ' चा ठराव दुरुस्त मसुद्यात अधिक स्पष्टपणे दिसतो. 'प्रादेशिक भाषांना त्यांचे योग्य स्थान मिळाले पाहिजे' एवढेच

मूळ मसुद्यात म्हटले होते. त्यात ' इंग्रजीच्या जागी ' हे शब्द दुरुस्त मसुद्यात घातले आहेत.

मागासलेल्या वर्गांना इतर वर्गांच्या बरोबर आणावयाचे असेल तर त्यांना केवळ समान संधि देणें पुरेसे नसून विशेष संधि दिली पाहिजे या संयुक्त समाजवाद्यांच्या भूमिकेची छाप दुरुस्त मसुद्यात दिसते. ' मागासलेल्या जमातींना सत्तेत भरीव वाटा मिळेल, एवढेच मूळ मसुद्यात म्हटले होते. त्याऐवजी ' बहुसंख्य ' हा शब्द दुरुस्त मसुद्यात घातला आहे.

समाजातून जातीय वादाचे निर्मूलनाचा प्रयत्न नवा पक्ष करील याचा समावेश संयुक्त समाजवाद्यांचे सूचनेनुसार दुरुस्त मसुद्यात करण्यात आला आहे.

संयुक्त समाजवादी पक्षाच्या बऱ्याच गोष्टी दुरुस्त मसुद्यात मान्य झाल्या असल्या तरी केवळ काँग्रेसविरोधाच्या पायावर ' सर्व विरोधी पक्षांची आघाडी उभारण्याचे धोरण त्यांना सोडावे लागले. उजव्या पक्षांशी केलेली युति ही केवढी मोठी घोडचूक होती, हे निवडणूक निकालांनीच दाखवून दिले. तेव्हा ती भूमिका त्यांनी सोडली, ते योग्यच झाले. पण सरसकट संयुक्त आघाड्यांचे धोरणच त्यांनी सोडावे हे समाजवादी चळवळीच्या विकासाचे दृष्टीने योग्य वाटत नाही.

' पूर्वीच्या चुका आम्ही करणार नाही. ' बनारस ' होऊ देणार नाही. नवा पक्ष यशस्वी करण्याचा आमचा निर्धार आहे ' अशी ग्वाही एकीकरण मसुद्यावर सह्या केल्यानंतर दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी दिली. तसा प्रयत्न ते करतील पण दोन्ही पक्षातील अनुयायांना हे नवे धोरण कितपत मान्य होईल ? सत्तेचा मोह सोडणे कठीण आहे. सत्तारूढ आघाड्यातून बाहेर पडण्याचे प्रश्नावर प्रजासमाजवादी पक्षाचे काही गट पक्षातूनच बाहेर पडण्याचा संभव आहे. तसेच संयुक्त आघाड्यांना सरसकट तिलांजली देण्याचे धोरण संयुक्त समाजवादी पक्षातील काही कार्यकर्त्यांना मान्य होणार नाही. असे असले तरी दोन्ही पक्षातील बहुसंख्य कार्यकर्ते नव्या धोरणास मान्यता देतील असे वाटते.

## नजरेआड करून चालणार नाही

दोन पक्षांचे एकीकरण ही समाजवादी शक्तींच्या एकीकरणाची नांदी ठरावी अशी नेत्यांची अपेक्षा आहे. आशावाद ठीक आहे पण आणखी कोणते पक्ष नव्या पक्षात सामील होण्याची शक्यता आहे ? महाराष्ट्रातील शे. का. पक्षाने संयुक्त समाजवादी पक्षात सामील व्हावे असे प्रयत्न यापूर्वी झाले पण ते यशस्वी झाले नाहीत. पुरोगामी गट, क्रांतिकारी समाजवादी पक्ष वगैरे इतर छोटे डावे गट कम्युनिस्टांशी अधिक जवळचे आहेत. तेव्हा ते गट नव्या समाजवादी पक्षात सामील होण्याची शक्यता नाही. सत्तारूढ काँग्रेसबद्दल भ्रमनिरास होऊन काँग्रेसमधील काही कार्यकर्ते आपल्याकडे येतील ही समाजवादी नेत्यांची अपेक्षाही फारशी खरी ठरण्याचा संभव नाही. उलट सत्तारूढ काँग्रेसमध्येच या दोन्ही पक्षांचे काही कार्यकर्ते जाण्याची शक्यता आहे. म्हैसूरमधील सबंध प्रजासमाजवादी पक्ष सत्तारूढ काँग्रेसमध्ये सामील झाला, ही घटना बोलकी आहे.

संयुक्त आघाड्यांमध्ये अनेक दोष असले तरी देशात प्रभावी विरोधी पक्ष निर्माण होत नाही तोपर्यंत संयुक्त आघाड्यांची गरज संपलेली नाही. प्राप्त परिस्थितीत सत्तारूढ पक्षाला प्रभावी विरोध करण्याचा आणि काही राज्यांत सत्तेवर येण्याचा तोच एक मार्ग आहे. जनआंदोलनेसुद्धा संयुक्त आघाडी परिणामकारकपणे लढवू शकेल. तेव्हा समाजवादी चळवळ पुढे न्यावयाची असेल तर संयुक्त आघाड्यांचे राजकारण सोडणे हा मार्ग नसून या आघाड्यांच्या कार्यपद्धतीतील उणीवा व दोष दूर करून त्या अधिक मजबूत कशा करता येतील याचा विचार सर्व डाव्या गटाच्या कार्यकर्त्यांनी केला पाहिजे.

एकीकरण होऊन नवा समाजवादी पक्ष स्थापन झाला तरी देशाच्या राजकारणावर पाडण्याइतके त्याचे वजन नाही. आणखी पक्ष त्यास मिळण्याची शक्यता नाही. उलट संयुक्त आघाड्यांना विरोध करण्याच्या त्याच्या धोरणामुळे डाव्यांची चळवळ अधिक कमकुवत व अधिक विस्कळित बनेल. केंद्रातील काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी नष्ट करण्याचा उद्देश नव्या समाजवादी पक्षाच्या धोरणाने साध्य न होता उलट काँग्रेसची सत्तेची पकड अधिक घट्ट होण्याचा संभव आहे.

एकीकरणाचा तावडतोबीचा परिणाम म्हणजे बिहार, पश्चिम बंगाल व केरळमधील सत्तारूढ आघाड्यांतून प्रजासमाजवादी पक्ष बाहेर पडेल. त्यामुळे या आघाड्या कमकुवत होऊन तेथील सरकारे गडगडण्याचा संभव आहे. पश्चिम बंगाल व केरळमध्ये याचा फायदा मार्क्सवाद्यांना मिळेल.

राष्ट्रवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद या चार स्तंभांवर नव्या समाजवादी पक्षाची इमारत उभी राहणार आहे. पण कित्येक प्रसंगी देशापुढे दोनच पर्याय असतात. त्यातून निवड करण्याचा प्रसंग येतो. अशा वेळी हा पक्ष कोणती भूमिका घेणार हे त्याच्या मसुद्यावरून स्पष्ट होत नाही. पश्चिम बंगालचेच उदाहरण या दृष्टीने घेण्यासारखे आहे. बिगर मार्क्सवादी आघाडी असे दोन तुल्यबल गट तेथे आहेत. समाजवाद्यांच्या धोरणाप्रमाणे त्यांचा मार्क्सवाद्यांना विरोध आहे, तसाच बिगर मार्क्सवादी आघाडीतील पक्षांनाही विरोध आहे. हीच परिस्थिती काही वर्षांनी सबंध देशात निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा वेळी समाजवादी कोणते धोरण स्वीकारणार? दोन अनिष्ट गोष्टींतून निवड करण्याचा प्रसंग येतो तेव्हा त्यातील कमी अनिष्ट गोष्ट आपण निवडतो, त्याप्रमाणे मार्क्सवादी आघाडी आणि बिगर मार्क्सवादी आघाडी यांतून निवड करण्याचा प्रसंग समाजवाद्यांवर येणार आहे. आम्ही तटस्थ राहू म्हणून भागणार नाही. कारण तटस्थता म्हणजे निष्क्रियताच ठरेल व त्यातून मार्क्सवाद्यांचे वजन वाढेल. हे होऊ द्यावयाचे नसेल तर संयुक्त आघाड्यांना सरसकट विरोध करण्याचे धोरण सोडून बिगर मार्क्सवादी आघाड्या बळकट केल्या पाहिजेत व त्यासाठी समाजवाद्यांनी अशा आघाड्यात सामील झाले पाहिजे.

□ □ □

‘ थ्रशर ’ – अमेरिकेची अतिशय सुसज्ज
आणि आधुनिक पाणबुडी
सागरतळाखाली बुडाली ! हे कसे घडले ?

# नऊ वाजून सतरा मिनिटे

जिप्सी मधुकान्त

दर्यावर शांतता होती. क्वचित् कुठे लाटा हलके लहरत दूरवर निघून जात. वातावरण स्वच्छ होते. सकाळी ६·२३ ला ‘ थ्रशर ’ पेरिस्कोपच्या खोलीइतकी वावरत होती. १९६३ मधली एप्रिल १० बुधवारची ती सकाळ. वारा सात नॉटच्या गतीने वाहत होता. सुखकर वाटत होता.

‘ स्कायलार्क ’ ही अमेरिकन नौका त्याच भागात गस्त घालत होती. तिच्या रेडिओ केबिनमध्ये चार जण ड्यूटीवर होते. – कॅप्टन, ले. कमांडर स्टॅन्ले हेळर, नौदल अधिकारी ले. जेम्स वॅटसन आणि इतर दोघे तंत्रज्ञ जलांतर्गत टेलिफोन ऐकत, लॉग भरत होते. ‘ थ्रशर ’ च्या हालचालीवर नियंत्रण ठेवण्याचे काम चालू होते. नुकतीच पोर्ट्स्माऊथच्या बंदरातून तिची दुरुस्ती, तपासणी होऊन ‘ थ्रशर ’ प्रायोगिक मोहिमेवर होती. २७८ फुटी, ३७०० टनी ही ‘ थ्रशर ’ पाणबुडी आक्रमक हल्ल्यासाठी दक्ष आणि सज्ज घडवण्यात आली होती. पाण्याखालून अण्वस्त्रांचा वापर करण्याची, शत्रूच्या पाणबुड्या उलथवण्याची तिची ताकद आघाडीची होती. आदल्या दिवशी १२९ लोकांसह थ्रशरने कमी उंचीपर्यंत ‘ डाईव्हज ’ घेतले होते. आता पुढची पायरी म्हणजे ७८०० पासून ८४०० फूट खोलीवर सावधगिरीने सूर मारायची चाचणी घ्यायची. डाईव्हजची मालिका सुरू झाली.

## ९·१३ ते ९·१७

७·५२ ला थ्रशरने रिपोर्ट केला – ४०० फूट खोली वरून. कुठे लीकेज वगैरे आहे का, याचा शोध घेतला. कसलाच त्रास नव्हता. ७·५४ ला तिने स्कायलार्कला सूचना दिली की, गुप्तता पाळण्यासाठी यापुढे सांकेतिक शब्दांचा वापर करून

खोली कळवली जाईल – ' टेस्ट डेप्थ मायनस एक्स फीट ' – (टेस्ट डेप्थ ही एक विशिष्ट चार आकडी संख्या होती.) : ८·३५ वाजता थ्रशरने कळवले. तो ' टेस्ट डेप्थ मायनस ३०० फुटांवर होती.'

८·५३ वा ती टेस्ट डेप्थवर असल्याचे कळले.

९·०२ : स्कायलार्कने विचारणा केली. उत्तर आले. ' जैसे थे. '

९·१२ : नेहमीचा ' रुटीन मेसेज, – दोन्ही नौकांनी दिला.

९·१३ ला मात्र नेमका काय संदेश प्राप्त झाला, हे कुणाला समजत नव्हते. अस्पष्ट शब्दातली ती खरखर टेपरेकॉर्डर नसल्याने टिपताही आली नाही ! तथापि, ते शब्द असे असण्याची शक्यता होती –' काही बारीक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. कोन वाढवलाय...फुंकण्याचा प्रयत्न करीत आहे.' पण ते 'व्हेग' होते ! – पाणबुडीचा कोन वाढवून बॅलास्ट टँकमध्ये हवा भरण्याचा प्रयत्न करीत पृष्ठभागावर येण्याची धडपड चालू आहे : असा त्यातून चौकशीच्यावेळी अर्थ निष्पन्न झाला.

कमांडर हेकरने फोन आपल्या हाती ओढून घेऊन विचारले – ' तुम्ही ' कंट्रोल ' ठेवून आहात की नाही ?' तो ओरडत होता. पण प्रत्युत्तर नव्हते.

९·१७ वाजता लाऊडस्पीकर पुन्हा काही खरखर. पण शब्द उमजत नव्हते. फक्त अखेरचे दोन शब्द ऐकू आले–' टेस्ट डेप्थ. '

नंतर कमांडर हेकरने म्हटले की, टँकमध्ये हवा भरण्याचा आवाज येत होता. पण ले. वॅटसनचा असा दावा आहे की, तो आवाज म्हणजे ' बोट कचकल्याचा, कंपार्टमेंट कोसळल्यासारखा ' वाटत होता.

नंतर १ तास ४७ मिनिटे ' स्कायलार्क ' त्या भागात घिरट्या घालीत होती. ' थ्रशर ' ला साद देणे चालू होते. प्रत्येक दहा मिनिटाला हँडग्रेनेड टाकून पृष्ठभागाचा संकेत दर्शवला. पण ' थ्रशर ' मौनाच्याही पलीकडे होती ?–

थोड्याच वेळात स्कायलार्क वरून भराभर संदेश सुटले. न्यू लंडनच्या तळावर, पेंटॅगॉनला, नौदलाच्या सचिवाला. दुपारी ४ वा. प्रे. केनेडींच्या कानावर ही बातमी गेली.

## " तो दुःखदायक प्रसंग..."

धूसर संध्याकाळच्या सीमारेषेवर स्कायलार्कने एक टापू टिपला–तिथले पाणी अगदी शांत होते. पण ते संथ, शांत पाणी नैसर्गिक वाटत नव्हते. पाण्यावर तेलाचा तवंग होता. पिवळे प्लॅस्टिकचे, तसेच बुचाचे काही तुकडे पसरले होते. वॉशिंग्टनला ही खबर पोचली तेव्हा नौदलाच्या ऑपरेशन–प्रमुखाला–अॅडमिरल अॅडरसन भयशंका चाटून गेली. ' थ्रशर 'च्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सांत्वनपर संदेश धाडण्यात आले. पत्र परिषद बोलावण्यात आली. सांगितले, ' जेव्हा, असे एखादे जहाज नापता

होते...सागराच्या सान्निध्य परंपरेत वाढलेल्या आपल्यासाठी ती एक निर्घृण दुःखदायक प्रसंग असतो.'

## शोधाला सुरुवात

दुसऱ्या दिवशी मॅसॅच्युसेट्सच्या वूड्स होल येथील सागरसंशोधन केंद्र आणि कोलंबिया विद्यापीठातील भूगर्भ संशोधन शाखेचे शास्त्रज्ञ वूड्स होलच्या 'अटलांटिस-२' या नौकेवरून 'त्या' स्थळी येण्यास निघाले. तोपावेतो अमेरिकन नौदलाच्या बोटींनी तो परिसर व्यापला होता. एकाला आण्विक ढालीचा चौरस फूट करपलेला प्लॅस्टिकचा तुकडा सापडला. दुसऱ्या एकीने तांबडे-पिवळे हातमोजे टिपले. 'थ्रशर'च्या रिॲक्टर सेक्शनमधले तंत्रज्ञ ते वापरीत. तिसऱ्या कुणाला एका लाइफ जॅकेटचे उसवलेले लोकरीचे बोळे आढळले.

'थ्रशर'च्या खोलीबद्दल अंदाज घेणे सुरू झाले. जवळपास ताशी १०० मैलाच्या गतीने आपल्या पूर्ण वजनाने ती तळाच्या गाळाकडे रोरावत गेली असावी. पहिला टप्पा होता सोनर यंत्रांच्या सहाय्याने वेध घेण्याचा. आदेश दिले गेले. टोकदार खडकावर थ्रशर आदळल्याचा संभव व्यक्त करण्यात आला. पण परिणामी, सोनरनी असे ध्वनित केले, की तळाचा उतार सौम्यसा होता. दरम्यानच्या काळात नौदलाची आधुनिक संशोधक नौका सॅन दिएगोहून बोस्टनला आली होती. तिची चाचणी चालू होती. तिलाही आणायची व्यवस्था झाली.

२२ एप्रिलला नौदलाने सहा पट्टे घोषित केले. त्यापैकी थ्रशर बुडाल्याचा पक्की खात्री असलेल्या पट्ट्याला 'पॉईंट डेल्टा' असे नाव दिले. २६ एप्रिलला अटलांटिस-२ ने डेल्टाची छायाचित्रे घेतली. ५०० पौंडी ५०० निगेटिव्ह कॅमेरा वापरण्यात आला. पाच तास पाण्याखाली हे काम चालू होते. वूड्स होलच्या अलेक्झांडर जॉन्स्टनने त्वरेने फिल्म धुतली. खडक, गाळ आणि काही सागरी वनस्पतींची बेटे–त्यावर उमटली होती. डेल्टांच्या कुठल्या भागातील ही चित्रे? वूड्स होल्सचे डॉ. जे. बी. हर्सी म्हणाले, तीन मजली इमारतीवरून एखादा पिंगपाँगचा बॉल डोळे बांधून तळाच्या छोट्या डब्यात टाकण्यासारखे हे काम आहे!

या डेल्टा प्रदेशाचा नेमका थांग लावण्यासाठी दुसरा इलेक्ट्रॉनिक गिअर वापरण्यात आला. चुंबकीय धातूंचा शोध घेणारे मॅग्नेटोमीटर्स, सोनर, टेलिव्हिजन कॅमेरा इ. जोडीला होतेच. कोणी एकाने, एखादी जुनीपुराणी मोडकी पाणबुडी त्या जागी आणून बुडवायची कल्पना काढली. खाली जाताना काय मार्ग लागतो ते पाहण्यासाठी हा प्राणायाम! पण १६ मेला काहीतरी घडले, आणि योजना बारगळली. अलेक्झांडर जॉन्स्टनने धुतलेल्या नवीन फिल्मवरून डॉ. हर्सींनी रिपोर्ट तयार केला होता. त्यात एका जागी एक दशांश मैल परिसरात कागदाचे तुकडे, वाकलेले पत्रे, धातू, इलेक्ट्रिक तारा आणि अनेक अस्पष्ट वस्तू पसरलेल्या असल्याचे अंधुक जाणवते.

संशोधनाच्या कामाला आता काहीसा जीव आला. त्याच जागी पूर्ण शक्ती लावायचे ठरले. आणखी छायाचित्रे घेण्यात आली. लॅमोंट ऑब्झरवेटरीच्या 'कोन्राड' नौकेला एक ऑक्सिजनची बाटली मिळाली. तळाशी एक उघडे पुस्तक अटलांटिस–२ ला सापडले. कोन्राडने एका दहा फुटी अवशेषाचा फोटो मिळवला. तसेच हैड्रॉलिक सिस्टिममध्ये वापरण्यात येणाऱ्या निषोप्रीन गास्केटची १५ पाकिटे सापडली. नक्कीच ती 'थ्रशर'वरील असावीत, असा अंदाज एक अधिकाऱ्याने व्यक्त केला.

– 'त्रिस्टी' या नौकेने आपल्या कामगिरीला सुरुवात केली. २४ ते २६ जूनच्या दरम्यान तिने पाच ड्राईव्हज घेतले. फक्त तिसऱ्या खेपेसच फळ लाभले. दोघा-जणांनी एक पिवळा बूट पाहिला. आण्विक पाणबुडीच्या रिॲक्टर भागातले तंत्रज्ञ तसे बुट वापरीत. त्यावर SSN. 5 अशी खूण कोरलेली होती. पाच ड्राईव्हज नंतर 'त्रिस्टी'ला पुन्हा दुरुस्तीसाठी बोस्टनला परतावे लागले.

## अवशेष मिळू लागले

२४ ऑगस्टला 'त्रिस्टी' परतल्यावर दुसरे पर्व सुरू झाले. पहिले दोन्ही ड्राईव्हज निष्फळ ठरले. पण २९ ऑगस्टला तिसऱ्या वेळी त्रिस्टी'वरच्या तंत्रज्ञांना काही वस्तू दिसल्या. तप्त केबिनमधून ते सुकाणू वळवत होते. समोर एकच खिडकी. त्यावर दर चौ. फुटावर २४० टन इतका पाण्याचा दाब पडत होता. त्या लोटात. या वस्तू दिसू लागल्या–तुटलेल्या केबल्स, पिचलेले पाईप, बॅटरीच्या प्लेट्स. "पुढे खूपच मोठ्या आकाराच्या वस्तू दिसत होत्या" असे. ले. कमांडर डोनाल्ड कीचने सांगितले. तळापासून अनेक फूट उंच असलेले काही तरी जाणवत होते. पण त्याहूनही ३५ फूट उंच अंतर ठेवूनच वावरावे लागत होते. कारण 'त्रिस्टी'ची पोलादी कातडी फारशी जाड नव्हती. धक्का लागता तर 'थ्रशर'सारखी गत झाली असती. काही तरी प्रचंड वस्तू रुतल्याची कल्पना येत होती.

पण ती 'थ्रशर'च होती का, याबद्दल अखेरचा निर्णय व्हायचा होता. 'त्रिस्टी' वरच्या यांत्रिक तरफेच्या सहाय्याने एक हूक अडकवून त्या दिशेने टाकण्यात आला. दोन तास ओढाताणीच्या खटपटीने तो हूक बाहेर आला. 'थ्रशर'च्या रिॲक्टर विभागातल्या फॅनरूममध्ये तो अडकून आला. त्या हुकात एक पितळी पाईप सापडला होता. त्यावर जॉब नंबर, पार्ट नंबर व '५९३' अंक होता. 'थ्रशर'चा तो ५९३ अंक एक संकेतच होता. समुद्रतळाशी ती खुरडून पडली होती. 'जगातील सर्वात आधुनिक' अशा त्या पाणबुडीच्या नशिबी ही दशा का यावी ?

शत्रूच्या कारवायांचा संशय आला. पण त्या भागात कित्येक मैल विदेशी जहाज नसल्याचे नौदलाने सांगितले. 'मानवी चूक' गृहीत धरण्यात आली ! पण पाण-बुडीवरचे तंत्रज्ञ मोठे निष्णात होते. न्यायालयीन चौकशीत ही शक्यताही अप्रयो-जक मानण्यात आली. पण ज्या कारखान्यात पाणबुडीचे भाग बनवण्यात आले,

त्यात दोष राहिला असण्याची शक्यता असावी. या तपासातून आणखी काही शक्यता मांडल्या गेल्या—१) 'थ्रशर'च्या पेरिस्कोपचा कंट्रोल मागच्या बाजूस होता. आणि 'वरचे' बटन दाबले म्हणजे पेरिस्कोप खाली जाई. २) पाणबुडीच्या 'एअर सर्क्युलेशन' योजनेत काही खात्री असावी. ३) हैड्रॉलिक सिस्टिमच्या २० टक्के झडपा पार्श्वपद्धतीने कार्य करीत. म्हणून जेव्हा 'बंद' बटन झटकले जाई, तेव्हा त्या उघडत. 'थ्रशर' वरच्या रजेवर असल्याने बचावलेल्या लेफ्टनंटने ही घटना सांगितली.

## शेवट असा घडला असावा...

पण हे दोष किरकोळ असल्याचे पोर्टस्माऊथ यार्डमधील फोरमननी सांगितले. त्यांनी पहिली चाचणी घेतली होती. पाण्याखाली जाताना काही मूलभूत चुकी घडली असावी, असे पुष्कळांचे मत पडले. न्यायालयीन चौकशीचा १७०० पृष्ठांचा अहवाल प्रसिद्ध झाला. अमेरिकन नौदलाच्या श्रेष्ठ तंत्रज्ञांना असे वाटल्याचे नमूद आहे की :—पेरिस्कोप उंचीपर्यंत पृष्ठभागावर अखेरचा दृष्टीक्षेप टाकायला 'थ्रशर' वर आली असावी, त्यावेळी कमांडर हार्वेने ७·४८ वा. डाइव्ह घेण्याचा आदेश दिला असेल. पाण्याच्या प्रचंड दाबाने 'थ्रशर' घुसमटली असावी खाली जाताना. एंजिनरूममध्ये टर्बाइनकडे पाईपमधून वाफ जाते. काही ट्यूब्सच्या सहाय्याने सागराचे पाणी तो भाग थंड ठेवण्यासाठी खेळवले होते. 'सर्व विभागांनी 'चेक' करून काही गळती वगैरे असल्यास रिपोर्ट करण्याचा' आदेश दिला गेला असेल. पाण्याच्या प्रचंड दाबाने काही फिटिंग्ज खिळखिळे झाले असण्याची शक्यता आहे. काही 'थेंब थेंब गळती' शोधून रिपोर्ट दिला असावा. पण ती काळजी करण्या· सारखी गोष्ट नसावी त्यावेळी.

मुख्य पेरिस्कोपजवळ आपल्या नेहमीच्या जागी हार्वे उभा असेल. केबिनमध्ये डायलवर धोक्याच्या लाल खुणा चमकत असतील. प्रत्येकजण सावध पण बिनघोर असावा. ९·१२ वा. अचानक काहीतरी फुटले. बहुधा पाईपात. आणि इंजिनरूममधला कूलिंग पाईपाचा — बाहेरून पाणी खेळवणाऱ्या — जोड निखळला असण्याची शक्यता. पाईप लहानसा. पण हजार फूट खोलीवर त्याचा लोट माणसाला आवरणार नाही. काही क्षणात सारे जलमय. त्यामुळे पॉवर सर्किट अथवा की कंट्रोल पॅनेल यात त्वरित बिघाड झाला असेल. अशा प्रसंगी बॅलॅस्ट टँकमधून हवा सोडण्याचा उद्वेगाचा आदेश कुणी दिला असेल. पण नियंत्रण शिथिल झाल्याने 'थ्रशर'ने मागे कलती घेतली. टेस्ट डेप्थच्या जवळ ती भराभर — अतिशय वेगाने बुडू लागली. त्यावेळी अखेरचा संदेश धाडला असावा.. नंतर एखाद्या अंड्यासारखी ती दुभंगली असेल. प्रचंड पाण्याच्या लोटाने मग उच्छेद केला. सारेच छिन्नभिन्न होऊन ती 'अत्युत्कृष्ट, आधुनिक, सुसज्ज' पाणबुडी तळाशी रुतून बसली...

□ □ □

ओत्तय म्हणजे एक
कल म्हणजे दगड
मंडू म्हणजे जागा
त्याचं झालं ओत्तयकलमंडू. पुढे त्याचाच अपभ्रंश
झाला-ओत्तकलमंडू...ओत्तकमंडू...उटकमंड.. उटी.
त्याच परिसरातली ही जमात...

---

# जस्ट फॅन्टॅस्टिक

**विजयानंद बर्फे**

तसे पाहिले तर सारेच जग वैचित्र्याने नटलेले आहे, भरलेले आहे आणि आपल्या भारताविषयी तर विचारूच नका ! कैक वैशिष्टचपूर्ण वैचित्र्यांनी तो तर प्रसिद्धच आहे. लोक, त्यांचे पोषाख, त्यांच्या भाषा, आचार-विचार, त्यांचे सणवार यांच्याविषयी जर आपण विचार करू लागलो तर पुष्कळदा आश्चर्यचकित होऊन जातो. कधीकधी तर विश्वाससुद्धा बसत नाही.

निलगिरीच्या परिसराविषयी मला बरेच आकर्षण होते. विशेषत: उटीविषयी ! महाबळेश्वर, पांचगणी, माथेरान, पाहून झाले होते. म्हणून उटीला जाण्याविषयी उत्सुकता होती. ' बेसिक मिलिटरी एक्सप्लोझिव्ह 'च्या कोर्सला गेल्यामुळे उटीला जाण्याचीही इच्छा पुरी झाली. तेथील अल्पकाळच्या वास्तव्यात ' तोडा ' जमातीविषयी कळाले. त्यांना पहावे असे वाटू लागले. वेळात वेळ काढून त्यांना पहायला गेलो आणि जवळ जवळ एक तास त्यांच्या सहवासात काढला. उटीतला माझा एक मित्र माझ्याबरोबर होता. त्याच्यामार्फत त्यांच्याशी बोललो. त्यांची वैशिष्टपूर्ण झोपडीही आत जाऊन पाहिली. तेही भारतीयच आहेत पण इतरांपेक्षा किती वेगळे ! त्यांची रहाणी, त्यांचे आचार-विचार किती विचित्र वाटतात ! पाच पांडव हे त्यांचे दैवत ! म्हणूनच की काय त्यांच्यांतील एक स्त्री चार-चार, पाच-पाच भावाबरोबर लग्न करून संसार करते !

पण त्याचवेळी मला हे कुणी सांगितले नाही की ' तोडा ' जमातीसारखी दुसरीही एक जमात निलगिरीच्या परिसरात आहे. पण ' तोडा 'पेक्षा वेगळी... अगदी भिन्न प्रकारची !

तिचे नाव आहे ' बडगा ' जमात !

मागच्या आक्टोबर महिन्यात अरुवण कडूच्या कॉडीईट फॅक्टरीतून एक सुपरवायझर बदली होऊन अॅम्युनिशन फॅक्टरीत आला व तोही माझ्याच सेक्शनला. तो यायच्या आधीच त्यांच्याविषयी आम्हाला कळले होते पण त्याला आम्ही जास्त महत्त्व दिले नाही, की उत्सुकताही-नवल दाखविले नाही. कारण तो येण्यापूर्वी त्याच जमातीचा एक सुपरवायझर आमच्याबरोबर होता. पण तो कधीच काहीच बोलला नाही व ताबडतोब त्याची बदलीही झाली.

पण हा जो नवीन सुपरवायझर आला त्याचे नाव आहे डी. जॉन अँथनी ! त्याचे वडील कन्व्हर्ट होऊन ख्रिश्चन झाले. म्हणून तो म्हणतो, ' मी जन्मतःच ख्रिश्चन आहे ! '

आमची ओळख झाली. घसट वाढली, मैत्री वाढली. गप्पागोष्टींच्या बैठकी जमू लागल्या. पण त्यात विशेष असे काही नव्हते. सारे काही नेहमीसारखेच !

असेच एके दिवशी आम्ही सारे टिफीनरूममध्ये चहासाठी जमलो होतो. सेक्शनमधील कोणातरी कामगाराचा नातेवाईक वारला होता. म्हणून पुष्कळसे कामगार रजेवर गेले होते आणि त्यामुळेच ' प्रेतक्रिये ' चा विषय निघाला. वेगवेगळ्या धर्मांतील, जातीजमातीतील, प्रांतातील प्रेतक्रियेच्या पद्धती कशा असतात याविषयी आम्ही बोलत होतो.

राघवन, गणपती, राममूर्ती, सेकर हे मद्रासी, मुझुमदार, रॉय हे बंगाली, म्हैसूरचा नचिकेत, आंध्रचा शिवरामुलु, केरळचा फिलिप्स, भोजुमल अडवाणी हा सिंधी, मी आणि भिरपे हे महाराष्ट्रीयन...जवळजवळ सारा भारत तेथे जमलेला होता. प्रत्येक जण आपआपले अनुभव सांगत होता.

जॉन अँथनी माझ्या शेजारीच बसलेला होता. इतकावेळ तो शांत बसलेला होता. तो एकाएकी मला म्हणाला, ' माझ्या जमातीतील प्रेतक्रियेची तऱ्हा जर मी सांगितली तर तुमचा विश्वासही बसणार नाही. '

' का रे ? असं काय विशेष आहे ?' मी म्हणालो.

' विशेषच नाही तर चमत्कारिकही आहे. ' जॉन म्हणाला.

मी सांग म्हणताच तो बोलू लागला. शेजारीच बसलेले राघवन, गणपतीसुद्धा कान देऊन ऐकू लागले.

' माझी ' बगडा कास्ट ' आहे. माझ्या खेडेगावाचं नाव आहे ' केरेहाडा.' माझ्या गावाला हे नाव कसं पडलं माहीत आहे का ? ' केरे ' म्हणजे ' चिखलयुक्त पाणी. ' हाडा ' म्हणजे खालची जागा-सपाट जागा ! असं म्हणतात की आमचा मूळ पुरुष हा म्हैसूरचा रहिवासी होता. तो निलगिरीवर आला. एका कड्यावरून त्याने खाली पाहिले असता त्याला मनोहारी निसर्गसौंदर्य दिसले पण बहुतेक जागा चिखलाने व पाण्याने व्यापलेली होती. त्याच्या जवळच त्याने वस्ती केली. म्हणून त्या

गावाला ' केरेहाडा ' म्हणतात.

' माझ्या गावात तीनशेच्या आसपास घरे आहेत. समजा एकादा मनुष्य मरणाच्या पंथाला लागला आहे असे कळले तर आसपासच्या चार-दोन बाया व माणसे गोळा होतात. त्या मरणाऱ्या माणसाजवळ बसून ते गप्पागोष्टी करतात. मधूनमधून एखादी बाई त्या माणसाच्या पायाला हात लावून पहात असते.... त्यांना काही तरी कळत असावे !

' एक स्त्री अशीच पायाला हात लावते व तिला पाय जरासे थंड लागते तर ती म्हणते, ' ह्याचे पाय थंड पडत आहेत. ' मग दुसरी हात लावून पहाते व म्हणते, ' खरंच ! ह्याचे पाय थरथत कापत आहेत. ' मग क्षणाचाही विलंब न करता एक जण उठून त्या माणसाचे डोळे मिटून गच्च दाबते. दुसरी त्याचे नाक दाबते. तिसरी त्याचे तोंड दाबते. तो मनुष्य सुटण्यासाठी धडपड करतो पण त्या स्त्रिया त्याला सोडीत नाहीत. आणखी घट्ट दाबून धरतात...तो मरत नाही तोपर्यंत. तो मेला अशी खात्री झाली की मगच त्या बाजूला होतात. '

' Horrible ! ' राघवन म्हणाला.

' हॉरिबल तर आहेच ! पण काय करणार ती एक आमची रीत आहे ! ' जॉन म्हणाला.

' पण समजा, जर एकादा खरंच मरणारा नसला तर ? ' मी विचारले.

' तसंही होतं ना ! एकदा तर काय झालं. एक जण असंच दाबून धरलं असता धडपड करून सुटला व उठून उभा राहिला आणि त्यानतर तो १०–१२ वर्षे जगला. '

माझा जॉनच्या बोलण्यावर अजूनही विश्वास बसत नव्हता. इतकी अमानुषता असू शकते काय ?'

' तू स्वतः कधी पाहिलंस का हे ? ' मी

' माझ्या आजोबाला तसंच मारलं ना ! त्यावेळी मी लहान होतो. असेन दहा एक वर्षांचा ! मी रडत होतो. ओरडत होतो की, ' तसं करू नका ' पण त्यानी कुणी ऐकल नाही. मलाच रागावून गप्प केले. ' जॉन बोलता बोलता क्षणभर थांबला. त्याचे डोळे पाणावल्यासारखे वाटले ! बरोबर आहे, तो ग्रॅज्युएट आहे. सुधारलेल्या जगात तो वावरतो आहे. त्याला अनेक मित्र आहेत. त्याच्या खेडेगावाबाहेरचे जग त्याने पाहिलेले आहे. आमच्याही मनावर ताण पडला होता. पण क्षणार्धात हसून तो म्हणाला, ' Is'nt fantastic ? ' मलाही ते असंच मारतील. कुणी सांगावं ? "

' ह्यं, काहीतरीच सांगतोस ! ' गणपती म्हणाला.

' मी खरं तेच सांगतोय. ' जॉन म्हणाला,

' पण असं का करतात ? ' मी विचारले.

'मला नक्की माहीत नाही. पण असं म्हणतात की मरताना माणसाचे डोळे व तोंड उघडे असणे चांगलं नसते. त्यामुळे माणूस भेसूर दिसतो व मरताना माणसाला त्रास होतो. म्हणून ते मरायच्या आधीच ते झाकून घेतात.' जॉन म्हणाला.

'मग काय करतात ?' मी विचारलं.

'मग त्या मेलेल्या माणसाचे पाय पिरगाळून तोडतात व मुडपून ठेवतात. तसं का करतात तेही मला माहीत नाही. खरी मजा नंतरच आहे. कुणीतरी मेलं आहे असं गावात समजले की साऱ्या स्त्रिया घरातूनच रडत रडत बाहेर पडतात व त्या मेलेल्या माणसाभोवती जमा होतात. मग तेथे जणू काय रडण्याची चढाओढच लागते. मग गावातले पुरुष – सर्व पुरुष, – डोक्यावरचे सारे केस काढून टाकतात. मग त्या मेलेल्या माणसाला तिरडीवर बांधून स्मशानात नेऊन पुरतात. मग काय करतात माहीत आहे का ? परत आल्यावर गावातला कुणीतरी सर्वांना दारू पाजतो. मग लोक दारू पिऊन, गाणी गातात, नाचतात. एकच जल्लोष उडून जातो.'

जॉनच्या जमातीविषयी जास्त माहिती मिळविण्याची माझी उत्सुकता वाढली होती. तोही रंगात आला होता. मी प्रश्न विचारीत होतो आणि तो त्याची उत्तरे देत होता.

'आमच्या स्त्रियांचा पोषाख फारच तोकडा असतो. पंचासारखे कापड असते ते अंगाभोवती घट्ट आवळून घेतात. पण त्याचीही एक विशिष्ट पद्धती आहे. फक्त अर्धे स्तन झाकून घेतात व स्तनावर एक पट्टा बांधतात. त्यामुळे अर्धे स्तन अनावृत्त असतात. तेच कापड खाली गुडघ्याच्यावर पाचसहा बोटे येते. थोडक्यात 'मिनी – मिनी स्कर्ट'सारखे ! कमरेला जाड कमरपट्टा बांधतात. त्याचा उपयोग तंबाखू वगैरे ठेवण्यासाठी करतात. आमच्या जमातीत सेक्सला एव्हडे महत्व नाही. म्हणजे त्यात काही गैर किंवा अनैतिक आहे असं कुणीच मानीत नाही. स्त्रिया नग्न होऊन उघड्यावर स्नान करतात. जवळून एकादा परका पुरुष गेला तरी त्यांना त्याचे काहीच वाटत नाही.'

'एकादा माझ्यासारखा परका तुझ्या गावी आला तर तुम्ही त्याला कसं वागवाल ?' मी विचारले.

"तसे आमचे लोक फार अतिथ्यशील आहेत. विशेषतः तरुण मुली ! तुझ्यासारखा परका गावात आला हे जर समजले तर प्रत्येक घरातून स्त्रिया-मुली त्याला डोकावून पहातील. त्याला पाहण्यासाठी धडपडतील. प्रत्येक घरातून त्याला कॉफी प्यायला आमंत्रण येईल. एवढेच नव्हे तर बळेबळे त्याला कॉफी पाजतील. मुलींचा त्याच्याभोवती गराडा पडेल. आणि समजा तो जर एकाद्या मुलीकडे पाहून हसला तर समजावं ती मुलगी तेथून हलणार नाही. त्याच्याच आसपास घुटमळत राहील.

मुलीचे स्वभाव फार सोशल आहेत. त्यांच्याशी ताबडतोब मैत्री जोडता येते याचं कारण मला वाटतं की तेथील वातावरण निष्पाप आहे. सेक्सविषयी त्यांच्या अवास्तव कल्पना नाहीत.'

'तुमच्यात लग्ने होतात का ?'

'होतात का म्हणजे ? होतात ना !'

'कशी होतात ?' मी विचारले.

'लग्नाची सुद्धा एक तऱ्हाच आहे. समजा एखाद्याला लग्न करायचे आहे तर प्रथम तो मुलीच्या बापाला दोनशे रुपये देतो व मुलीला आपल्या घरी घेऊन येतो. नंतर ती स्त्री गरोदर झाली तरच त्यांचे लग्न होते. जोपर्यंत ती गरोदर होत नाही तोपर्यंत त्यांचे लग्न होत नाही. लग्न कसे लागते माहीत आहे का ? लग्नाच्या दिवशी रात्री नवरदेव एका बाजूला तोंड करून जमिनीवर झोपतो. त्याच्या विरुद्ध दिशेला तोंड करून – त्याच्याकडे पाठ करून नवरी झोपते. दोघांच्यामध्ये एक उशी ठेवतात. नवरानवरीने रात्रभर तसेच झोपायचे असते. पण एकमेकांना स्पर्श करायचा नाही. स्पर्श होऊ द्यायचा नाही. आजूबाजूला इतर लोक त्यांच्यावर नजर ठेऊन असतात. उजाडेपर्यंत हे असं चालतं. सकाळ झाली की झालं, त्यांचं लग्न लागलं ! आमच्या जमातीत एक मनुष्य कितीही बायका करू शकतो. किंवा वारंवार घटस्फोट घेऊन दुसरी लग्ने करू शकतो.'

'म्हणजे घटस्फोटाची पद्धत तुमच्यातही आहे का ?' राघवनने विचारले.

'आहे का म्हणजे ? घटस्फोट घेण्याची किंवा देण्याची पद्धत फारच सोपी आहे. समजा, एखाद्याला बायकोपासून घटस्फोट घ्यावयाचा असेल तर तो तिला बापाच्या घरी पाठवून देतो. मग दोन-तीन महिन्यांनंतर तो एका निरोप्याकरवी तिला कळवितो की, मी दुसरं लग्न करणार आहे. –बस्स ! झाला घटस्फोट. तो दुसरं लग्न करायला मोकळा व तीही मोकळी ! दुसरा कुणीतरी टपून असतोच. तो तिच्याशी लग्न करतो. त्यात त्यांना काहीही वाटत नाही. पहिला संसार विसरून ते दुसरा संसार सजवितात.

'लग्नापूर्वी मुलीला बरंच स्वातंत्र्य असते. पण त्यामुळे ती कधीच कुमार्गाला लागत नाही. पण लग्नानंतर मात्र तिच्यावर खूप बंधने पडतात आणि तिलाही त्यात काही वाटत नाही. सुनेने सकाळी उठल्यावर प्रथम सासूसासऱ्याच्या पाया पडलं पाहिजे. ती सासऱ्याच्या समोर बसू शकत नाही. सारेजण जेवायला बसले तरी तिला त्यांच्याबरोबर बसून जेवता येत नाही. तिने बाजूला कोपऱ्यात उभे रहायचे असते. त्यांचे जेवण संपेपर्यंत. आणि हे सर्व चालू असते ती स्वतः सासू बनेपर्यंत !'

'काय रे जॉन, बाळाचा जन्म झाला तर तो तुम्ही कसा साजरा करता ?... तुम्ही काय करता ?' मी विचारले.

'बहुतेक तुमच्यासारखंच आम्ही करतो. पण मुलाचं नाव ठेवायच्या वेळेला मात्र गंमत असते. गावातील प्रत्येकजण येईल. हातात भाताचा शीत घेईल. मग एखादे नाव...म्हणजे गणेश, रामन, ह्यासारखं एखादे नाव पुटपुटेल व ते भाताचे शीत बाळाच्या तोंडात घालील, म्हणजे ४००–५०० नावे त्या बाळाला मिळतात. मग त्यातीलच एखादे नाव पुढे प्रचलित होते. पण आमच्यांतील बहुतेकांची नावे इतकी 'फनी' असतात–म्हणजे त्या नावांना काहीच अर्थ नसतो.'

'म्हणजे ?' राघवनने विचारले.

'उदाहरणार्थ, पेनाईकलन, मोटारकलन, गुडाकलन, पिटारीकलन, ओनाकई-कलन इत्यादी. खरं म्हणजे कोणत्याच भाषेत ह्या शब्दांना काहीही अर्थ नाही. बीनअर्थाचे शब्द आहेत हे. पण आमच्यात फार प्रचलित आहेत.'

'तुमची भाषा कोणती ? मी विचारले.

'माझी भाषा 'बडगु.' आमची भाषा ही फक्त बोली भाषा आहे. तिला लिपी नाही. जॉन म्हणाला.

'तुझं नाव काय ? असं तुझ्या भाषेत कसं विचारायचं ?' मी म्हणालो.

'निन्ना एसाऊ एना ?' 'एसाऊ' म्हणजे 'नाव.' 'निन्ना' म्हणजे 'तुझं' व "एना' म्हणजे 'काय.' मग तू उत्तर द्यायचंस, 'एन्ना एसाऊ विजयानन्दु !' इथं एन्ना' म्हणजे 'माझं.'

''उटकमंड' किंवा 'उटी' हे नाव कस पडलं हे ठाऊक आहे का तुम्हाला ? असं म्हणतात की, 'तोडा' जमातीचा मूळ पुरुष जेव्हा निलगिरीवर रहायला आला तेव्हा तो एका अखंड दगडाच्या गुहेत रहात होता. म्हणून त्या जागेला म्हणत 'ओत्तय कल मंडू.' 'ओत्तय' म्हणजे 'एक.' 'कल' म्हणजे 'दगड' आणि 'मंडू' म्हणजे 'जागा.' तेच झालं 'ओत्तयकलमंडू.' मग त्याचा पुढे अप-भ्रंश होऊन 'ओत्तकलमंडू', 'ओत्तकमंडू', 'उटकमंड' नि शेवटी 'उटी' हे झाले असावे. 'उटी' हा शब्द उटकमंडचा शॉर्टफॉर्म म्हणून इंग्रजांच्या काळात उपयोगात येऊ लागला असावा.

गप्पा रंगल्या होत्या. जॉन म्हणाला, 'माझ्या गावात शिकणाऱ्या मुलाला खूप मान देतात. एखादा मुलगा बाहेर गावी कॉलेजात शिकायला गेला की, जणू काय तो 'फॉरेन'ला गेला असंच समजतात. माझ्या गावातून ग्रॅज्युएट झालेला मीच पहिला आहे.

इथे पुण्यात येऊन जॉनला काही महिनेच झालेले आहेत. त्याच्या बायकोला व लेकरांना येथील हवा विशेषतः उष्णता मानवत नाही. तो म्हणतो, 'पूर्वी आमच्या स्त्रिया गावाची वेस ओलांडून कधीच बाहेर जात नसत. गावापलीकडे दुसरे जग

पृष्ठ ६२ वर

शीला पाटील



# धुक्यात हरवली वाट

## सामाजिक समस्येचा कलात्मक वेध

सहसा आपण सामान्य मध्यमवर्गीय माणसे चारचौघांसारखेच जनरूढींशी मिळते-जुळते घेत जगत असतो–परिस्थितीशी तडजोड करीत. या चाकोरीतून बाहेर पडण्यास डिवचणारा एक जिप्सी तसा–आपल्याही मनात दडून बसलेला असतोच. पण सामाजिक सुरक्षिततेची आपल्याला इतकी ओढ असते की, त्या जिप्सी-मनाचे हुंकार आपण ऐकले-न-ऐकलेसे करतो आणि सामाजिक प्रतिष्ठा-मानसन्मान यांच्या रेशमी कोशात स्वतःला गुरफटवून घेऊन खुशाल राहतो.

पण एखादी व्यक्ती अशी बंडखोर असते की, तिला या सामाजिक प्रतिष्ठेपेक्षा आपल्या मनाची प्रेरणा अधिक महत्त्वाची वाटते. तिच्या भोवतीची परिस्थितीही तिला काचणारी असते. पण त्यामुळे त्या परिस्थितीशी तडजोड करण्याची अगतिक वृत्ती मात्र तिच्यात नसते. उलट त्या परिस्थितीला तोंड देऊन तिच्यातून आपल्याला हवे तसे विश्व निर्माण करून स्वतंत्रपणे मनमाने जगण्याची जिजीविषा तिच्यात असते-प्रसंगी सामाजिक प्रतिष्ठेला वाऱ्यावर सोडून ! कोठलेही बांध न जुमानता खळाळत जाणाऱ्या एखाद्या प्रपाती नदीसारखे या मनस्वी व्यक्तीचे जीवन असते.

सामाजिक सुरक्षिततेच्या चौकटीला जिवापाड कवटाळून बसणाऱ्या मध्यमवर्गीय मराठी समाजात अशी एखादी प्रमाथी युक्ती असली तर एकच हाहाकार उडतो. एखाद्या गरीब गाईप्रमाणे स्वतःची वधुपरिक्षा करून घेण्यास नकार देणारे तिचे अकाली प्रौढत्व आलेले मन, प्रसंगी स्वतःच्या विचित्र परिस्थितीतून बाहेर पडण्यास सहाय्य करणाऱ्या एखाद्या विवाहित प्रौढाकडे ओढ घेते आणि मग आपल्या प्रामाणिक भावनांची जिवापाड कदर करणाऱ्या त्या प्रगल्भ मनाला कोणीच अडवू शकत नाही. त्या ' दि मॅन 'चे आपल्यापेक्षा दुप्पट असणारे वय, त्याचा संसार, आपल्या पदरी येणारी सामाजिक अवहेलना यांपैकी काहीही तिच्या बोथट झालेल्या विवेकाला जागृत करू शकत नाही.

पुरुषांनाही वयाच्या मध्यान्हीला टेकण्याआधी पुन्हा एकदा कात टाकावीशी

वाटते, पुन्हा कोणीतरी आयुष्यात यावे, पुन्हा कोणीतरी जीव लावावा आणि विसरत जाणारे तारुण्य, पुन्हा अस्पष्ट का होईना, पण आठवावे, असे वाटत असतेच ! अशी एखादी युवती आयुष्यात आली की, पुन्हा त्याचे हरपलेले तारुण्य त्याला लाभते, जीवनात नवीन रस वाटू लागतो.

पण काही झाले तरी अखेर तो पुरुष असतो. जेव्हा आत्मप्रतिष्ठेचा प्रश्न येतो तेव्हा पुरुषाचे खरे स्वरूप प्रकट होते. आत्मप्रतिष्ठेपुढे मग त्याला प्रेमाची मातब्बरी वाटत नाही. त्याच्यामध्ये गुंतून पडलेल्या त्या वेड्या जिवाला तो पैसा देऊ शकतो, पण सामाजिक प्रतिष्ठेचे संरक्षण देऊ शकत नाही आणि हे कधीच मिळणार नाही हे मनोमन उमजले असतानाही, त्या पुरुषामध्ये सर्वस्वाने गुंतलेल्या त्या जिवाला अगतिकतेच्या भावनेने त्याच्या सावलीमागे फरफटत आयुष्य घालवावे लागते.


' दिल एक मंदिर ' व ' प्यार किये जा 'च्या निर्मात्यांची
आणखी एक हृदयस्पर्शी भेट

CHITHRALAYA — चित्रालया प्रस्तुत
श्रीधर कृत
दुनिया क्या जाने
ईस्टमनकलर

| कथा-दिग्दर्शक | संगीत | संवाद-गीते |
| --- | --- | --- |
| श्रीधर | शंकर जयकिशन | राजेंद्र कृष्ण |

**लिबर्टी-डिलक्स** ▪ **चित्रा** ▪ **पॅलेम** ▪ **कुमकुम**
३, ६ा, ९ा ३ा, ६ा, ९ा, १२ा, ३ा, ६ा, ९ा, १२ा, ३ा, ६ा, ९ा.
**रूपम** – **सिटीलाईट** – **नेपच्यून** – **डीफेन्स** – **लीडो** – **लक्ष्मी**
३ा, ६ा, ९ा, १२ा, ३ा, ६ा, ९ा (वांद्रे) (कुलाबा) (जुहू) (पार्ले)
**अंबर-संगम** (अंधेरी), **अनुपम** (गोरेगाव), **न्यूइरा** (मालाड), **अजंठा** (बोरिवली), **सहकार** (चेंबूर), **आकाश** (कुर्ला), **उदय** (घाटकोपर), **कृष्ण** (भांडुप), **जवाहर** (मुलुंड) **अशोक** (ठाणे), **ऑलविन** (कल्याण) **अमन-प्रकाश** (उल्हासनगर)

— छाबडा प्रकाशन —

स्वतःचे असे वेगळे विश्व निर्माण करून !

पण तिथे तेवढेही सुख समाजाला संमत नसते. कारण काही झाले तरी त्या विवाहित पुरुषाला त्याची मानिनी पत्नी असते, विवाहाला आलेल्या मुली असतात. 'तिच्या' अस्तित्वामुळे या साऱ्यांच्या प्रतिष्ठेला बाध येतो. आपल्यामुळे आपल्या प्रिय व्यक्तीची कुचंबणा थांबावी म्हणून अखेर स्वतःच्या मनाला मुरड घालून, अनेकांच्या सुखासाठी स्वतःच्या सुखावर तिलांजली देण्यास तिला सिद्ध व्हावे लावते.

एक प्रौढ विवाहित पुरुष व एक मनस्वी तरुणी यांच्यामधील नीतिबाह्य प्रेमाचे चित्रण धिटाईने करणाऱ्या शं. ना. नवरे यांच्या 'धुक्यात हरवली वाट' या नवीन समस्याप्रधान नाटकाची नायिका राधिका हेच करते. उपकारदाते 'साहेब' विवाहित व कुटुंबवत्सल आहेत, हे माहीत असतानाही त्यांच्या नावाने मंगळसूत्र घालणारी राधिका, लौकिक अर्थाने त्यांची पत्नी म्हणून मिरविण्याचे भाग्य लाभले नसतानाही त्यांच्यावर उत्कटपणे प्रेम करते. पण केवळ प्रेम व पैसा राधिकेला संरक्षण देऊ शकत नाही. जेव्हा तिला कोणी गुंड मवाली फोनवरून अगदी गलिच्छ भाषेत सतावीत असतो तेव्हा, तो मवाली पत्नीला फोन करील, या भीतीने साहेब त्याचा बंदोबस्त करू शकत नाहीत.

राधिकेकडे पाहुणा म्हणून आलेला राजेश हा बोलघेवडा चित्रकार, त्या गुंडाला खरमरीत तंबी देऊन, तिला पुरुषार्थाचे तेज दाखवितो. पण साहेबांची पत्नी तारा हिने केलेल्या विनंतीनुसार राधिकेचा स्वीकार करायला मात्र अखेर तो तयार होत नाही. इंदोरला त्याची वाट पाहत थांबलेल्या खारूताई मनूकडे तो निघून जातो. साहेबांच्या संसारसुखासाठी दूर अज्ञात स्थळी एकांतात त्यांच्या आठवणींवर जगण्याचा निर्णय राधिकेला घ्यावा लागतो.

## शंनांची हळुवार मांडणी

आजच्या प्रौढ विवाहाच्या व स्त्रीशिक्षणाच्या काळात तीव्रतर झालेल्या या समस्येची अगदी हळुवार मांडणी शं. ना. नवरे यांनी त्यांच्या 'धुक्यात हरवली वाट' नवीन नाटकात केली आहे. संवेदनाक्षम, मनस्वी राधिकेची व्यक्तिरेखा त्यांनी ठसठशीत रेखाटली आहे. राजेश या बोलघेवड्या पात्रामुळे नाट्यकथेतील गंभीरपणाचा ताण हलका व्हायला चांगलीच मदत झाली आहे. प्रतिष्ठा व 'इंडियन समर' प्रेम यांच्या कात्रीत सापडलेले साहेब आणि मुलांच्या सामाजिक असुरक्षिततेच्या भावनेने व्याकुळलेली त्यांची पत्नी तारा या व्यक्तिरेखाही चांगल्या आहेत. भैय्यादा ही व्यक्तिरेखा मात्र राजेशचा कथानकात प्रवेश होण्यापुरती आलेली वाटते ! नाटकातील चुरचुरीत संवाद प्रेक्षकांची चांगलीच दाद घेतात.

राधिकेची अवघड भूमिका आशा पोतदारने आव्हानपूर्वक सादर केली आहे. कित्येकदा तिच्यापुढे इतर पात्रे फिक्की पडतात. उसळत्या, बडबड्या राजेशच्या दुय्यम भूमिकेत श्रीकांत मोघे यांनी अकृत्रिम, मोकळ्या अभिनयामुळे नायकाचा

भाव खाल्ला. साहेबांची भूमिका करणारे शशीकांत राजाध्यक्ष अभिनयाचे काही बारकावे चांगले दाखवितात, पण त्यांचे शब्दोच्चार स्पष्ट होत नव्हते. ताराच्या भूमिकेतील तडफदारपणा, अगतिकता सुमन धर्माधिकारींनी चांगली उभी केली. भैय्यादांची भूमिका करणारे विनय काळे यांना अभिनयाला वावच नव्हता.

'अभिजात' या नाट्यसंस्थेने दर्जेदारपणे रंगभूमीवर आणलेल्या या नाटकाचे दिग्दर्शन श्री. नंदकुमार रावते यांनी समर्थपणे केले आहे. पण पहिल्या अंकात मोकळ्या स्वभावाच्या राजेशने, मनूमध्ये गुंतलेला असतानाही, साहेबांवर प्रेम करणाऱ्या राधिकेशी केलेली लगट पटत नाही! बाबा पार्सेकर यांनी उभारलेले राधिकेच्या बंगल्याचे नेपथ्य व फोनवरून बोलणाऱ्या व्यक्ती दाखविण्यासाठी केलेला गॅजचा वापर आकर्षक होता. पण एका फर्मचे मालक असलेल्या साहेबांचे घर मात्र त्यांनी अगदीच सामान्य दाखविले. भास्कर राणे व कमलाकर केळुस्कर यांची प्रकाशयोजनाही समाधानकारक होती.

'मन पांखरू पाखरू' या शं. नां.च्याच पहिल्या नाटकानंतर 'अभिजात'ने रंगभूमीवर दर्जेदारपणे आणलेले हे दुसरे नाटक, तिच्याविषयीच्या व या नाटककाराविषयीच्या प्रेक्षकांच्या अपेक्षा उंचाविणारे आहे. ☐ ☐ ☐

❀

## फॅन्टॅस्टिक

पृष्ठ ५६ वरून

आहे हेही त्यांना माहीत नसे. पण आता परिस्थिती बदलत आहे.'

जॉनला पुणे आवडले आहे. इथे तो रमला आहे. नोकरीत शक्य झाले तर तो इथेच राहील. पण त्याला गावाकडची ओढ आहे. निवृत्तीनंतर तो 'केरेहाडा'लाच जाऊन स्थायिक होणार आहे.

तो मला म्हणतो, 'एकदा तरी मी तुला माझ्या गावी घेऊन जाईन. प्रत्यक्ष पहा नि लिही किती लिहायचं ते!'

मग मीही हसून म्हणतो, '...खरंच, मलाही तुझ्या गावी यायला आवडेल!'

☐ ☐ ☐

# विनामूल्य

सव्वाशे रुपये किंमतीच्या
दहा दर्जेदार पुस्तकांची
विनामूल्य भेट

माणूसची ५ वर्षांची
१०० रुपये वर्गणी
भरल्यास




हीदहा
दर्जेदार पुस्तके
विनामूल्य
भेट मिळतील.

किंवा....

पण हे शक्य नसल्यास

# १०० रुपये

पाच वर्षांसाठी

राजहंस प्रकाशन संस्थेकडे

# ठेव म्हणून

ठेवल्यास

सव्वाशे रुपये किंमतीची

सलामी योजनेतील

ही दहा दर्जेदार पुस्तके

ठेवीदारास मिळतील.

आणि

पाच वर्षांनंतर

शंभर रुपयांची ठेवही

परत मिळेल.

पुरंदरच्या बुरुजावरून

झुंड

नाझी भस्मासुराचा उदयास्त

अग्निपुत्र

व्होल्गा जेव्हा लाल होते

संध्याकाळ

आणि ड्रॅगन जागा झाला

सांगते ऐका

मुक्ताफळे

प्रभात

# योजनसंबंधी आणखी थोडे

'साप्ताहिक माणूस'ची पाच वर्षांची शंभर रुपये वर्गणी १५ ऑगस्ट १९७१ पर्यंत भरणाऱ्यास पाच वर्षे 'माणूस' अंक व योजनेतील दहाही पुस्तके मिळतील.

---

'माणूस'चे चालू वार्षिक वर्गणीदार पुढील पाच वर्षांसाठी शंभर रुपये वर्गणी भरून या सलामी योजनेत सहभागी होऊ शकतील.

---

पाच वर्षे 'माणूस' वर्गणीचा पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'साप्ताहिक माणूस' या नावे पाठवावे. सोबतच्या पत्रात 'सलामी योजना' असा खुलासा असावा.

---

ठेव पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनि-ऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'राजहंस प्रकाशन' या नावे पाठवावे. सोबतच्या पत्रात 'सलामी योजना' असा खुलासा असावा.

---

रक्कम चेकने पाठवणे सोयीचे असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवावी.

---

योजनेतील पुस्तके दोन गटात प्रकाशित होतील: पहिला पाच पुस्तकांचा गट डिसेंबर १९७१ अखेर व दुसरा सुमारे पुढील वर्षाच्या मध्यास (जून–जुलै १९७२) वर्गणी-ठेवीदारांच्या हाती पडेल.

---

टपाल व पॅकिंग खर्च वर्गणी-ठेवीदार यांचा राहील.

## सलामी योजनेतील पुस्तके

अंदाजे मूल्य

### पुरंदरच्या बुरुजावरून
ब. मो. पुरंदरे
१०.००

### झुंड
अनुवाद अनंत भावे
१५.२०

### नाझी भस्मासुराचा उदयास्त
वि. ग. कानिटकर
२५.००

### अग्निपुत्र
वसंत पोतदार
१४.००

### सांगत्ये ऐका
हंसा वाडकर
८.००

### आणि डोंगन जागा झाला
अरुण साधू
१२.००

### संध्याकाळ
गजानन जागिरदार
८.००

### प्रभात
शरद गोखले
७.००

### मुक्ताफळे
ग्यानबा
१०.००

### व्होल्गा जेव्हा लाल होते
वि. स. वाळिंबे
१८.००

साप्ताहिक माणूस / राजहंस प्रकाशन / १०२५ सदाशिव पुणे ३० / फोन ५७३५९

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. M-H 649



"युनियनच्या आदेशाप्रमाणं एकतर्फी करायची भाडेवाढ आम्ही उद्यापासून अंमलात आणू ... आजचा दर आहे प्रत्येक सीटला किमान दहा रुपये ! ..."